वाचनालय
वा.वा. २०७१
१।७।८८

[illegible] ग्रंथसंग्रह शाळा
[illegible]
क्र. २०७१ दिनांक १।७।८८
विषय वा.वा. क्र. ......

EVBK-0402071

# असे होते--
# साडेतीन शहाणे

( ऐतिहासिक व्यक्तिरेखा )

लेखिका -- सौ. सुजाता भागवत

BVBK-0402071

BVBK-0402071

नागपूर प्रकाशन, नागपूर १२

© सर्व हक्क प्रकाशकाधीन
प्रकाशन क्र. १६६

प्रकाशक :
दि. मा. धुमाळ
नागपूर प्रकाशन
सीताबर्डी मेन रोड, नागपूर

प्रथमावृत्ति
१९८६

मूल्य रु. १६ फक्त

मुद्रक :
अभय लवाटे
मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
टिळक पुतळ्याजवळ, महाल, नागपूर

# प्रस्तावना

'असे होते- 'साडेतीन शहाणे,' म्हणजेच पेशवाईतील प्रसिद्ध साडेतीन शहाणे होत. पेशवाईतील साडेतीन शहाणे म्हटले, की जाणकार लोक लगेच 'सख्या, देवा, विठुला' म्हणतात. परंतु सामान्य वाचकांना याचा अर्थ कळत नाही आणि मग मनात प्रश्न उभा राहतो की, हे साडेतीन शहाणे होते तरी कोण ? त्यांनी काय काय पराक्रम केले ? हे सर्व जाणून घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

पेशव्यांचे सखाराम बापू बोकील, निजामाचे विठ्ठल सुंदर व भोसल्यांचे दिवाकर पुरुषोत्तम चोरघडे हे तीन पूर्ण शहाणे. त्यात पुढे नाना फडणीस अर्धे शहाणे वाढले. पेशवे, निजाम व नागपूरकर भोसले यांच्या घरातील दुहीचा फायदा घेऊन, चढाईच्या कपटाने आपले मतलब तीन देशस्थ शहाण्यांनी साधले आणि दोन वर्षे महाराष्ट्रात प्रलय उडवून दिला. त्यावरून या साडेतीन शहाण्यांची उपरोधिक आख्यायिका मूळ उत्पन्न झाली. या सर्व शहाण्यांची जीवनवृत्ते त्यांनी केलेले खेळ तत्कालीन घडामोडींच्या संदर्भाने व उपलब्ध कागदांच्या पुराव्याने समजून घेतल्याशिवाय या प्रसिद्ध आख्यायिकेचे हृद्गत कळणार नाही.

हे तिघे पूर्ण शहाणे समवयस्क होते. सन १७६३ च्या सुमारे पंचेचाळीस उमरीचे, तर अर्धेशहाणे नाना फडणीस त्यांचेहून पंचवीस वर्षांनी लहान म्हणजे वयाने पण अर्धेच होते. नाना फडणीस नुसतेच लेखणी बहाद्दर असून त्यास युद्धकलेचे ज्ञान नव्हते अशी समजूत होती, म्हणून त्यांस अर्धे शहाणे म्हणतात. नाना प्रकारच्या कारस्थानांनी एकाचा डाव दुसऱ्याने मोडून काढावा, एकमेकांकडील बातम्या आचारी, पुजारी, मोलकरणी वगैरेंच्या द्वारे काढून शहास प्रतिशह लढवावा, धन्याचे कुटुंबात कलह वाढवून आपल्याशिवाय तरणोपाय नाही अशी त्याची भावना करावी, असे या तीन शहाण्यांचे सामान्यत: धोरण असे. म्हणून कै. खरे शास्त्री या शहाण्यांना दीड शहाणे म्हणजे फाजील शहाणे म्हणतात.

कोणत्याही युवतीने स्वतःची पोतडी भरावी, असे या तीन शहाण्यांचे खेळ मनमुराद चालत. बुद्धिबळाच्या डावातील प्यादे मागे घ्या किंवा सचिव पताकडे नथ पाठवा, इत्यादि वलृप्त्या या शहाण्यांच्या निदर्शक आहेत. राज्याची अव्यवस्था होते आहे, हे त्यास दिसे; परंतु ती सुधारण्याकडे बुद्धीचा व्यय न करता तिच्यापासून केवळ स्वार्थ साधण्याकडे त्यांची नजर असे. उच्च राष्ट्रीय कामगिरी सोडून नीच कावेबाजीत त्यांनी संतोष मानला. राज्याच्या निरंतर हिताची परवा त्यांनी ठेवली नाही.

थोरल्या माधवरावांनी आपल्या ह्यातीत या शहाण्यांच्या खटपटी ह्याणून पाडल्या. एकास स्वर्ग दाखविला, दुसऱ्यास कैदेत घातले, तिसऱ्यास जवळ बाळगून निर्माल्य केले. पण माधवरावांच्या अकाली निधनामुळे या शहाण्यांच्या कारवाईला पुन्हा जोर आला असतांना नाना फडणिसांनी यांना चांगलाच धडा शिकवून त्यांना पायबंद घातला.

हे पुस्तक लिहितांना डॉ. ग. ह. खरे यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. तसेच श्री. य. न. केळकर यानीही मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच 'पुणे मराठी ग्रंथालय,' याचे व्यवस्थापक व सेवक वर्ग यांनी वारंवार मला हवी असलेली पुस्तके देऊन उपकृत केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते तसेच श्री. शंकर रामचंद्र दाते यांनी पण वेळोवेळी उपयुक्त सुचना केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. माझे हे पुस्तक वाचक गोड मानून घेतील अशी मला आशा आहे.

१०-१०-८५ सौ. सुजाता भागवत

अस्मिता अपार्टमेंटस्,
घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे ५

# अभिप्राय

सौ सुजाता भागवत यांनी पेशवाईतील साडेतीन शहाण्यांचा परिचय या पुस्तकात दिला आहे. त्यात तत्कालीन परिस्थितीचे स्वरूप उत्तम रीतीने व्यक्त झाले आहे. पेशवाईत सखारामबापू यांचे नाव बारभाई राजकारणात प्रसिद्ध आहे. निजामाच्या राज्यात विठ्ठल सुंदर यांची विशेष प्रसिद्धि होती व सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे मराठ्यांच्या राज्यांचे दीर्घकाळ संरक्षण करणारे नाना फडणवीस हे होत. थोरले माधवराव यांचे निधन झाल्यानंतरच्या पंचवीस वर्षातील राज्यकारभारात या मंडळींचा पुढाकार होता. त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्याने व हिकमतीने राज्यांचे रक्षण केले इतकेच. पण या काळात महाराष्ट्रात नेता असा कोणी न उरल्यामुळे आपापसात बजबजपुरी माजली. कर्तृत्वहीनतेमुळे अखेर पेशवाई बुडाली. बारभाईचे राजकारण म्हणजे सत्तेचे राजकारण व आपापसातील स्पर्धेचे राजकारण होते. या स्पर्धेपायीच स्वातंत्र्य गेले. या परिस्थितीचे चित्र या साडेतीन शहाण्यांच्या कारवाया व कारभार यातून दिसून येते. हा इतिहास बोधप्रद आहे. आजच्या परिस्थितीशी तत्कालीन परिस्थितीचे साम्य बरेच जाणवते. सौ. सुजाता भागवत यांनी वस्तुस्थितीचे चित्र उत्तम रीतीने रेखाटले आहे.

१६-१२-८५ शंकर रामचंद्र दाते

# अभिप्राय

श्रीमती सौ. सुजाता भागवत यांनी यापूर्वी लिहिलेले श्रीमंत गोपिकाबाई पेशवे यांचे छोटे सुंदर चरित्र इतिहास-वाचकांना परिचितच आहे. आता त्यांनी पेशवाईतील साडेतीन शहाण्यांची छोटी चरित्रे गुंफिली आहेत. विठ्ठल सुंदर, सखाराम बापू, देवाजीपंत चोरघडे, हे तीन पूर्ण शहाणे व अर्धाशहाणा तो नाना फडणीस. अशी ऐतिहासिक दंतकथा प्रसिद्ध आहे. पण या तिघांची एकत्र माहिती चटकन कुठे मिळत नाही. ती सोय सौ. सुजाता भागवतांच्या पुस्तकाने झाली आहे. व्यवसाय इतिहास संशोधकाचा नसताही त्यांनी पुष्कळ परिश्रम करून ही चरित्र चित्रे काढली आहेत ती सामान्य जिज्ञासू वाचकांना खास आवडतील.

२५-९-८५ य. न. केळकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| (१) | सखाराम बापू | १–२१ |
| (२) | बापूंच्या आख्यायिका | २२–२३ |
| (३) | देवाजीपंत चोरघडे | २४ |
| (४) | विठ्ठल सुंदर | ३२ |
| (५) | नाना फडणीस | ३७ |
| (६) | नानांच्या चातुर्याच्या कथा | ६५ |

# आधार आणि आभार


(१) नाना फडणिसांचे चरित्र लेखक– श्री. वा. वा. खरे शास्त्री
(२) पेशवे दप्तर भाग २, ५, ७, ९, १२, २० ३५, ३९,
(३) पुरंदरे दप्तर भाग ३ लेखक– श्री. कृ. वा. पुरंदरे
(४) माधवराव पेशवे चरित्र ले. स. अ. सहस्रबुद्धे
(५) सखाराम बापूंचे चरित्र ले.– य. गो कानेटकर
(६) म. रियासत मध्य विभाग २, ४, ले.– गो. स. सरदेसाई
(७) राजवाड्यांची साधने भाग १०, १२, १३
(८) नागपूर प्रांताचा इतिहास ले.– यादव माधव काळे
(९) नागपूरकर भोंसल्यांची बखर ले.– काशीराव राजेश्वर गुप्ते
(१०) थोरले शाहू महाराजांचे चरित्र ले.– का. न साने
(११) पेशव्यांची बखर ले.– कृ. वि सोहनी
(१२) निग्राहक माधवराव म. रि. भाग ४ ले. गो. स. सरदेसाई
(१३) काव्ये– संग्रहात प्रसिद्ध पत्रे यादी वगैरे लेख ले.– का. ना. साने
(१४) भा. इ. सं मंडळ त्रैमासिक स. १९२७ वर्ष ८, अंक १/२
(१५) साडेतीन शहाणे ले.– शं. रा. देवळे
(१६) म. रि. मध्य विभाग ३, ४ ले.– गो. स. सरदेसाई




सखारामबापू बोकील

ग्रा. क्र. २०७९ ९७।२।८८
विषय बाबा

# सखारामबापू (अल्पपरिचय)

## प्रकरण १ ले

सखारामबापूंचा चुलत आजा, महादाजी यमाजी, शाहूच्या अत्यंत भरवशातला असून त्यांनी संभाजी महाराजांजवळ व कैदेत शाहूपाशी राहून जे कष्ट केले, त्याबद्दल छत्रपती शाहू राजांनी महादाजी यमाजीस हिवरे गाव व काही जमीन इनाम करून दिली. महादाजी यमाजी निपुत्रिक वारल्यामुळे त्यांचा इनामी गाव व इनामी जमीन जुमला सखाराम बापूंच्या थोरल्या भावाच्या नावाने झाला. निंबाजी भगवंत, बाजो भगवंत व सखाराम भगवंत, या त्रिवर्ग बंधूंत बापू सर्वांत लहान. हे त्रिवर्ग कर्तृत्वान होते. हे कुटुंब एकत्र असून ते पुढे शके १६८७ त विभक्त झाले.

सखाराम बापूंचे संपूर्ण नाव सखाराम भगवंत बोकील असे होते. बापूंचे वडील भगवतराव थोरल्या बाजीरावाकडे शिलेदार असल्याचे उल्लेख त्या वेळच्या कागदपत्रांत मिळतात. बापूंचा जन्म इ. स. १७१६ साली झाला. ते सासवड जवळच्या हिवरे गावी राहणारे. लहानपणी ते महादजीपंत पुरंदरे यांचेकडे शिलेदार होते. लहानपणापासून बापू चाणाक्ष, तरतरीत, हुशार व समयसूचक होते. हे त्यांचे गुण पाहून बाजीराव पेशव्यांनी त्यांना आपणांकडे मागून घेतले. या संबंधाने एक आख्यायिका आढळते ती अशी—

पहिले बाजीराव पेशव्यांची स्वारी महादाजीपंत पुरंदरे यांचेकडे एके दिवशी जेवावयास आली. जेवणाचा थाट फारच मोठा होता. परंतु त्या दिवशी बाजीरावांच्या आवडीची तिळाची चटणी करावयाची राहून गेली. सर्व मंडळी जेवावयास बसली असता बाजीरावांनी महादाजीपंतांस

"आवडीची तिळाची चटणी कां केली नाही ?" असे विचारले. तेव्हा महादाजीपंत गडबडून गेले. परंतु सखाराम बापूंनी, "आज रविवार असल्याने, तीळ, मधु, मांस व स्त्री हे चार पदार्थ वर्ज्य असल्याबद्दल वचन सांगून त्याकरिता आज तिळाची चटणी केली नाही." असे पेशव्यास उत्तर दिले. पेशवेही बापूंचा हजरजबाबीपणा पाहून बहूत संतोषित झाले व भोजनानंतर 'हा माणूस मजला पाहिजे,' म्हणून बापूस महादाजीपंतापासून मागून घेतले.

बापूंस लष्करी व कारकुनी बाण्याचे शिक्षण नानासाहेब, सदाशिवराव भाऊ, राघोबा यांच्या बरोबरच मिळाले. पुढे इ. स. १७३२ मध्ये बाजीराव पेशव्यांनी शनिवारवाडा बांधण्याच्या कामावर सखाराम बापूंची कारकून म्हणून नेमणूक केली. याच वर्षी बापूंचे लग्न झाले असावे. कारकुनीची नोकरी १७३५ मध्ये सोडून महादाजीपतांच्या सल्ल्याने बापू सरदाऱ्या करू लागले व त्याबद्दल सालिना ३०० रु. तनखाही त्यास मिळू लागला. पहिल्या बाजीरावाची शेवटची वर्षे सखाराम बापूंनी पाहिली व महादाजी पंता बरोबर कामगिऱ्यात यथाशक्ति भागही घेतला. याबद्दल १७४१ च्या सुमारास त्यांचा तनखा ३७७ रु. झाला.

सन १७४१ च्या सुमारास नाना साहेबांबरोबर माळव्याच्या स्वारीत व नंतर १७४४ च्या स्वारीतही बापू उत्तरेकडे गेले होते. माळव्याच्या स्वारीत तीर्थयात्रा झाली व देश पहावयास मिळाला. उत्तरेतून परत आल्यावर बापू कर्नाटकच्या स्वारीवर गेले. या स्वारीत मराठ्यांचा जय झाला. अलोट संपत्ति आणून बापूंनी शाहूचे कर्ज फेडले. त्यामुळे नानासाहेब पेशवे व शाहू महाराज यांचा बापूंवर लोभ जडला व त्यांच्या कर्तबगारीची कल्पना आली. या कारणामुळे स्वारीनंतर बापूंचा तनखा २५०० रु. करण्यात आला व एक गाव इनाम मिळाला. नंतर त्यांना रघुनाथरावाबरोबर गुजराथमध्ये पाठविले.

गायकवाडांबरोबर समेट करून बापूंनी गुजराथची मोहीम यशस्वी केली. सन १७४८ मध्ये नेवाईच्या स्वारीत बापू व महादाजीपंत नाना

साहेबांस मागाहून जाऊन मिळाले. मल्हारराव होळकराने दत्तियास मोर्चे लावून ते ठिकाण घेतले. बापू यावेळी होळकरांच्या सैन्यात होते. त्या वेळेस दिल्लीतील वजीर मनसूर अलीखान याजकडील वकील येऊन त्यांनी "दुराणीचा व आमचा हशीम लागला आहे. ये प्रसंगी साहेता करणे उचित आहे" असे मल्हाररावास कळवून त्यांची मदत मागितली. बापूंचाही सल्ला असाच पडला की, "मनसूर अल्लीखानाकडील राजकारण राखावे." या कारस्थानातूनच मराठ्यांचे उत्तरेकडील राजकारण शिजले व त्यात सखाराम बापूने प्रामुख्याने भाग घेतला. नेवाईच्या स्वारीतून परत आल्या-वर पेशव्यांनी बापूंना चांबळीचे शेत, विहीर पान मलियासुद्धा दिले, व पालखीही दिली. यावरून सखाराम बापूस मोठाच मान त्यावेळी मिळाला. यावेळी बापूंची नेमणूकही वाढून ती सहा हजार रु. झाली. अशा प्रकारे इतमाम, ऐश्वर्य, राजकारणात मानाचे स्थान बापूंस प्राप्त झाले. 'अहदनामा' प्रमाणे मराठ्यांनी मोंगल पातशाहीच्या रक्षणाची जबाबदारी उचलली.

याच्या मोबदल्यात मराठ्यांना राजपुताना, सिंध, पंजाब, माळवा, रोहिलखंड यांत चौथाई, व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला. मोंगल बादशाहीला रोहिले, पठाण, अबदाली असे देशी परदेशी अनेक शत्रू होते. त्यांच्या बंदोबस्तासाठी नानासाहेब पेशवे यांनी राघोबा दादांची नेमणूक केली व सखाराम बापूंना उत्तरेतील स्वारीचे मुख्य कारभारी नेमले. या नवीन कामगिरीवर राघोबा व बापू गुजरात मधून परस्पर गेले. होळकर आणि शिंदे यांच्या बरोबरीने त्यांनी कामगिरी पार पाडली. कुंभेरीला जाट शरण आले. उत्तरेत कामे पुष्कळ होती. मोंगल प्रदेशात स्थिरस्थावर करावयाचे होते. काशी, प्रयाग इत्यादि क्षेत्रे सोडवावयाची होती. राजपुतान्यात शांतता स्थापन करावयाची होती. भरपूर सैन्य असूनही जिंकलेल्या प्रदेशातील लोकांची मने त्यांना आपल्याकडे वळवून घेता आली नाहीत. सर्वच कामे अपुरी राहिली. रघुनाथराव व सखाराम बापू परत आले. त्याच्या मागोमाग अब्दालीची स्वारी आली. दिल्ली, आग्रा, मथुरा यांची लूट झाली, मोठाल्या कत्तली झाल्या. 'अहदनाम्यात' कबूल केल्याप्रमाणे रघुनाथराव फौजेसुद्धा दुसऱ्यांदा उत्तरेस निघाले !

बापू हेच पुन्हा त्यांच्या स्वारीचे कारभारी होते. अब्दाली जाताच यांनी पुन्हा सर्वत्र आपला अंमल बजावला.

पंजाब प्रांतावर अब्दालीचा मुलगा अंमल चालवीत असे. त्याच्यावर मोहिमा काढण्यात आल्या, तो पळाला. त्याचा पाठलाग बापूंनी अटकेपर्यंत केला अटकेवर मराठ्यांचे झेंडे लागले. मोठेपणाचा अगदी कळस झाला ! "हिंदुस्थानचे अधिराज्य" करण्याची भाषा सुरू झाली. हे सर्व करण्यात सखाराम बापूचा वाटा फार मोठा होता. पेशव्यांच्या दरबारात त्यांचे वजन वाढले होते.

# प्रकरण २ रे

सन १७६१ साली पानिपतवर मराठ्यांचा दारुण पराभव झाला. कर्ते व अनुभवी माणसे गमावली. मराठे कमजोर झालेले पाहून निजामाने मराठ्यांच्या मुलखावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली. पानिपतच्या पराभवाच्या दुःखाने नानासाहेब पेशवे वारले. नंतर माधवराव पेशवे झाले. त्यांनी पानिपतचे अपयश धुवून काढले. विस्कटलेली घडी नीट बसवली. राक्षसभुवनाच्या लढाईनंतर माधवरावांनी राज्यकारभार आपल्या हाती घेतला. या लढाईत माधवरावांनी निजामाला चांगलाच धडा दिला त्यानंतर ३० वर्षे निजाम मराठ्यांच्या वाटेस गेला नाही.

माधवराव पेशव्यांनी इ. स. १७६३ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर हैदरावर स्वारी केली. याचे कारण म्हणजे पेशव्यांचा स्नेही सावनूरचा नबाब याच्यावर हैदरने स्वारी करून त्याचा पराभव केला व दुसरे कारण म्हणजे मुराररावाकडून खंडणी घेतली होती. हैदरअली हा अत्यंत धूर्त, कपटी, शूर, साहसी व प्रसंगावधानी होता. सावनूरच्या आसपास मराठ्यांचा तळ पडला होता. श्रीमंतांचे स्वारी समागमे कर्नाटकात स्वारी कारभारी म्हणून सखाराम बापू होते तेव्हा मुक्कामी फौजेचा भरणा काय आहे, कोण सरदार कोणचे बाजूस आहेत वगैरे बातमी काढण्याकरिता खासा हैदरखान फकिराचा वेष घेऊन रात्रीस गोटात फिरत असतो, वारंवार येत असतो अशी बातमी बापूस लागली. तेव्हा बापू त्याच्या पाळतीवरच राहिले.

एके दिवशी संध्याकाळच्या वेळी बापूंच्या कानावर लांबून फकिराची धून आली. "दिया सोही दाता ऽ नहीं दिया सो ही दाता ऽऽ अल्ला सबका

भला करेगा." तो आवाज ऐकून सखाराम बापू तंबूच्या बाहेर आले. त्यांनी पाहिले छावणीतील शिपाई त्याला कोणी शिवराई, दोन शिवराई भिक्षा घालत होते. तो फकीर त्यांना तोंडभर आशीर्वाद देत होता. सखाराम बापूंनी लगेच दारावरच्या पाहारेकऱ्याला सांगितले, "त्या फकिराला इकडे बोलावून आणा. तो न आला तर त्याला पकडून आणा."

फकिराला बोलावताच तो बापूंच्या डेऱ्याशी आला. बापूंनी त्याला आत बोलाविले. बैठकीवर बसावयास सांगून ते त्याच्याकडे रोखून पाहू लागले. बापूंच्या जवळ हैदराची एक तस्वीर होती. ती पाहून हैदराचा चेहरा फकिराच्या चेहऱ्याशी जुळताच बापूंनी त्याचा हात धरून म्हटले, "तू फकीर नसून हैदर खान आहेस. मी तुला बरोबर ओळखले आहे. तुम्हास सरकारात नेऊन गुजरावे लागेल. चौकशी अंती फकीर झाल्यास सुटका होईल, तोपर्यंत जाऊ देणार नाही."

ते ऐकून फकीर म्हणाला, "होय मीच हैदरअली आहे." ते ऐकताच सखाराम बापू एकदम गरजले, "कोण आहे रे तिकडे? या फकिराला पकडा आणि शेजारच्या तंबूत बंदोबस्ताने ठेवा." लगेच चार शिबंदी धावून आले. त्यांनी मौलवीला पकडून बंदोबस्तात ठेविले. नंतर बापूंनी खूप विचार केला. हैदरचे सैन्य किती आहे? त्या सैन्याची निष्ठा किती आहे? हैदरला आपण पकडले आणि पेशव्यांकडे नेले नाही तर? पण ही वार्ता गुप्त राहील काय? ते शक्यच नाही. त्याला माधवरावां-पुढे उभे केले तर काय होईल? पण शेवटी हैदराकडून जबर दंड घेऊन त्याला सोडून देण्याचाच विचार त्यांनी पक्का केला. जरा वेळानी बापूंनी एका हुजऱ्याला बोलावून सांगितले, "मघाशी गिरफदार केलेल्या मौलवीला आत घेऊन ये आणि तू बाहेर उभा रहा." फकिराने बापूजवळ वचन मागून, "मी हैदरखान मजला जीवदान द्यावे," असे विनविले.

"त्याबद्दल तू आम्हांस काय देणार?" बापू म्हणाले.

"तुम्ही लागेल ते मागा, मी ते देतो. पण माझी सुटका करा." हैदर बोलला.

बापूंनी पुन्हा विचार केला की, 'चोहू देशात चार खुला आहेत. म्हणून सरकारात फौज बाळगून हुशार राहून दरसाल त्यापासून खंडण्याही घेतात. तेणेकरून लाखो फौज पोसली जाते. यास्तव हैदरखानासारखा मोहरा हाती लागला असता याजवर उपकार करून सोडावे.

बापू म्हणाले, "द्या तर मग दोन लाख रुपये."

हैदराने आपल्या भिक्षेच्या झोळीतून खुणेचे दोन दगड काढले. ते एका चौकटीच्या रुमालात बांधून तो म्हणाला, "हे घ्या आणि येथून पूर्वेला दोन अडीच मैलावर मायन हळ्ळीच्या अलीकडे एक राहुटी आहे. तेथे नेऊन द्या आणि दोन लाख रु. घेऊन या."

सखाराम बापूंनी लगेच स्वार पाठविले. पैसे हातात पाडून घेतले, आणि फकिराची सुटका केली.

ही बातमी गुप्त हेरांनी माधवरावांच्या कानावर घातली. चार दिवसांनी माधवरावांनी बापूंना आपल्या तंबूत बोलावून घेतले. खास एकांतात घेऊन त्यांना निक्षून विचारले, "तुम्ही दोन गुन्हे केले आहेत की नाही ? केले असतील तर तुम्ही शिक्षेस तयार व्हायला पाहिजे."

"गुन्ह्यांचा उच्चार व्हावा, सत्य असतील तर मी प्रायश्चित्तास तयार आहे." बापू म्हणाले.

"पहिला गुन्हा म्हणजे मराठ्यांचा प्रस्तुतचा शत्रू हैदर अली फकिराच्या वेषात तुमचे हाती आला असता तुम्ही त्यास सोडून दिलेत आणि दुसरा गुन्हा, त्याच्या पासून दोन लाख रुपये लांच घेतलीत." माधवराव म्हणाले.

हैदरसारखा मोहरा हाती लागला असता त्याच्यावर उपकार करून सोडावे हे उचित, शिवाय माझ्या डोळ्यापुढे पगाराची बाकी थकलेली मराठ्यांची फौज होती. हैदरला मारण्यापेक्षा काही पैसा हाती लागतो की काय इकडे माझे लक्ष, मी हैदर अलीकडून दोन लाख रुपये घेतले पण ते सर्व सरकारात जमा केले. मराठ्यांच्या सैनिकांना पगार देता यावा, फौज पोसावी यासाठी हा खटाटोप. अशा रीतीने आपल्या फौजेतील लोकांची पोटे भरतात, नाहीतर त्यांची वाट काय ? त्याबद्दल तुम्ही द्याल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहे." याप्रमाणे गोड बोलून बापूंनी माधवरावांचा राग शांत केला.

यावर माधवराव पेशव्यांनी काही न बोलताच बापूंना निरोप दिला. अखेर कर्नाटकातील या युद्धात हैदर जेरीस आला त्याने माघार घेतली, तहासाठी बोलणे लाविले तेव्हा पेशव्यातर्फे सखाराम बापू आणि हैदर अलीच्या वतीने अप्पाजीराव यांच्यामध्ये तह ठरला. या तहात तुंगभद्रेच्या उत्तरेचा मुलूख हैदरने सोडावा आणि मराठ्यांना तीन लाख रु. खंडणी द्यावी असे ठरले. हैदरावरील स्वारीतील कामगिरीबद्दल खुष होऊन माधवराव पेशव्यांनी मौजे पिंपळे, चांबळी वगैरे कन्हेपठारावरील चार गावातील जमीन सखाराम बापूंना इनाम दिली. बक्षीस पत्रात माधवराव पेशव्यांनी लिहिले, "सखाराम बापू हे राज्यातील पुरातन सेवक, त्यांनी स्वामिसेवा एकनिष्ठपणे बहुत दिवस केली. यास्तव त्यांचे चालविणे म्हणून हे बक्षिस दिले."

पण पुढे त्यांचे माधवरावांशी न पटल्यामुळे व बापूंचा ओढा रघुनाथरावांकडे असल्यामुळे माधवरावांनी त्यांना कारभारी पदावरून दूर केले. त्यांचा सल्ला माधवराव विचारीत मात्र त्यांना ते पक्के ओळखून होते. माधवराव एकदा काही कागद जाळीत बसले असता सखाराम बापू तेथे गेले "काय जाळता ?" असे बापूंनी माधवरावांना विचारताच ते म्हणाले, "मी फितुरीचे कागद जाळीत आहे."

"असे कागद पुराव्यासाठी जरूर रक्षावेत." असे बापूंनी म्हणताच माधवराव पेशव्यांनी एक पत्र बापूंच्या हाती दिले. ते पाहताच बापूंचा नूर एकदम उतरला.

श्रीमंत म्हणाले, "बापू, असेही कागद ठेवावेत काय ?" बापू काही बोलले नाहीत. माधवराव होते तोपर्यंत त्यांनी फारशी खटपट केली नाही. श्रीमंत विचारतील तेव्हा ते सल्लामसलत तेवढी देत. माधवरावांनी शेवटी सखाराम बापूंना पुन्हा विश्वासात घेतले. त्यांच्या व रघुनाथरावांच्या हाती त्यांनी अल्पवयी नारायणरावांना दिले. "मागील सर्व भांडणे विसरून राज्याचे हित साधावे" असे त्यांनी दोघांना सांगितले. कर्नाटकातील तिसऱ्या मोहिमेवरून परत आल्यावर माधवरावांनी बापूंना पुन: कारभारी म्हणून नेमले नंतर माधवरावांची प्रकृती बिघडून ते आजारी झाले.

म. ग्रं. मं. ... शाखा.
...
क्र. २०७९ ... ९३१८८
विषय त्याती ...

# प्रकरण ३ रे

माधवरावाने मरणसमयी सखाराम बापूंकडून, "माझ्या जिवात जीव असेपर्यंत नारायणाचे रक्षण करीन." अशी शपथ घेतली होती. राजकार्य-धुरंधर बापूंची कर्तबगारी माधवराव ओळखीत असल्यामुळे त्यांच्या व राघोबांच्या हातात नारायणरावास दिले व "मागील सर्व विसरा" म्हणून सांगितले. गोष्ट राज्याच्या हिताचीच झाली. ही व्यवस्था करण्यात माधवरावांचा दूरदर्शीपणा दिसून येतो. माधवरावांनी नारायणरावास सखाराम बापूंच्या धोरणाने वागत जा म्हणून सांगितले होते. परंतु नारायणरावांनी त्याकडे लक्ष दिले नाही. एके प्रसंगी सखाराम बापूंचा त्यांनी भरदरबारात शिवीगाळ करून अपमान केला. सखाराम बापू व राघोबा एक मताने वागू लागले. याचे नारायणरावास वैषम्य वाटू लागले. गोपिकाबाईंनी सखाराम बापूस कारभारातून काढून टाकण्यास सांगितले. दादासाहेब व नारायणराव यांचे द्वैतभाव वाढत गेले. त्यामुळे नारायणरावाने दादांस पुन्हा प्रतिबंधात ठेविले. बापूंचे व त्याचे पटनासे झाले. त्यांनी नाना फडणीस यांना हाताशी धरले, पण नानाचेही ते ऐकत नसत.

राघोबांनी हैदर अलीकडे व नागपुरच्या भासल्याकड कदतून सुटून जाण्याविषयी कारस्थान केले. हे कारस्थान नारायणराव गंगापुराहून परत आल्यानंतर उघडकीस आले. त्यामुळे दादासाहेब व आनंदीबाई यांची कैद फारच कडक करण्यात आली. दादासाहेबांस नारायणराव राज्यकारभारा-संबंधी सल्ला विचारीत, तर ते त्याकडे लक्ष देत नसत. तेव्हा चिडून जाऊन नारायणरावाने दादांचा कैदेत छळ केला. कैदेतील छळ असह्य झाल्यामुळे

दादा व आनंदीबाई यांनी उपोपण करण्यास सुरवात केली. आनंदीबाईने सखारामबापूस आपल्या हालअपेष्टांची कहाणी कथन केली व या बाबतीत बापूसारख्यांनी काहीच मदत न केल्यास 'जीभ हासडून प्राण देऊ.' अशी घोर प्रतिज्ञा केली. या गोष्टीमुळे बापूसही फार वाईट वाटले व ते राघोबांच्या सुटकेची योजना करण्याच्या खटपटीस लागले. पेशव्यांच्या बखरीत बापू व मोरोबा यांनी "राघोबांच्या मुक्ततेकरिता नारायणरावास धरावे", अशी अक्षरे लिहून एक चिठ्ठी गारद्यांच्या पुढाऱ्याजवळ रघुनाथ रावांच्या सहीकरिता दिली. ती आनंदीबाईच्या आकस्मिक हाती आल्यावर तिने 'ध' चा 'मा' केला, अशी हकीकत आहे.

यावरून कटाची सर्व जबाबदारी बापू व मोरोबा यांच्यावर पडते व नारायणरावांच्या खुनाचे जनकत्व आनंदीबाईकडे येते. तुळया पवाराची जी जबानी उपलब्ध आहे, तिच्यावरून सखाराम बापूने तो कट रचिला व महंमद युसफ करवी नारायणरावास ठार मारिले, असे सिद्ध होते. नाना फडणीस व हरिपंत फडके निश्चितपणे या कटात नव्हते. मुधोजी भोसल्या-कडून राघोबा व सखाराम बापूस नारायणराव बेड्या घालणार असे कळल्यावरून नारायणरावास मारण्याची मसलत कटवाल्यांनी फार जलदीने अमलात आणली. पण नारायणरावांच्या खुनामुळे बापूंच्या मनास चरका बसला.

मरण समयी माधवराव पेशव्यांनी नारायणरावास सखाराम बापूंच्या हाती दिले होते व "त्याचे रक्षण करून कारभार करीन" असे बापूंकडून वचन घेतले होते. असे असता नारायणरावांचे रक्षण आपले हातून झाले नाही याची बापूंच्या जिवास खंत वाटत होती. त्यामुळे सखारामबापू कारभारात उदासीन होते. त्यांच्या अपेक्षेबाहेर सर्व गोष्टी घडून आल्या. बारभाईच्या कारस्थानाची उभारणी बापूंच्या या मनोवृत्तीतून झालेली आहे. नारायणराव पेशव्यांचा खून झाला त्यावेळी शनिवार वाड्यात शिरून गारदी दंगा करीत असल्याची बातमी वणव्यासारखी पुण्यात पसरली. या बातमीने शहरातील लोक घाबरून गेले. बाजार, दुकाने बंद झाली. रस्त्यात लोकांची पळापळ सुरू झाली. मोठा बिकट प्रसंग ओढवला. अशा या

आणीबाणीच्या वेळी सखाराम बापू, नाना फडणीस, त्रिंबकराव पेठे, मोरोबा-दादा फडणीस आणि इतर सरदार आणि कारभारी कोतवाल चावडीत जमा झाले. त्यांनी स्वार व फौज जमा करून शहराची नाकेबंदी केली. चौक्या पहारे उभ्या करून लोकांत धीराचे वातावरण निर्माण केले, पण शनिवारवाडा गारद्यांच्या ताब्यात होता. वाड्यावर तोफा डागून गारद्यांचा बंदोबस्त करावयाचा पण वाड्यात पेशव्यांच्या स्त्रिया व आप्त मंडळी होती म्हणून हा विचार सोडून द्यावा लागला. बाहेर मंडळी पेचात पडली होती. अशा वेळी शनिवार वाड्यातून सखाराम बापूंना खुद्द दादासाहेबांची चिठ्ठी आली. चिठ्ठीत लिहिले होते की, "चिरंजीवराव गारद्यांच्या कटकटीत मारले गेले. मीही त्यांच्या कैदेत आहे तुम्ही आत येऊन भेटावे"

चिठ्ठी मिळाल्यावर इतर मंडळींच्या विचाराने सखारामबापू शनिवार वाड्यात दादासाहेबांना भेटावयास गेले. वाड्यातील दृश्य पाहून बापू थक्क झाले. गारद्यांनी केलेल्या कत्तलीच्या खुणा ठिकठिकाणी दिसत होत्या जागोजागी गारदी नंग्या तरवारी घेऊन पहाऱ्यास उभे होते. सखारामबापू दादांच्या खोलीकडे आले. दादासाहेब डोक्याला हात लावून बसले होते. समोर नारायणराव पेशव्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे पडलेले होते. रडारडीचा कल्लोळ उडाला होता मधूनच कोणीतरी दादासाहेबांच्या नांवाचा जयजयकार करीत होते. आतील हे सर्व दृश्य पाहून सखाराम-बापूंना अतिशय वाईट वाटले. ते दादासाहेबांना म्हणाले, "आमचे शरीरी समाधान नाही. आम्ही घरास जातो. कारभाराचे धनी फडणीस आहेत त्यांना बोलावून आणून कारभार करावा.".

निरोप घेऊन बापू वाड्यातून बाहेर पडले. या सर्व प्रकाराने बापूंना धक्का बसला. त्यांनी नाना फडणिसांच्या सल्ल्याने बारभाई कारस्थान उभे केले. प्रथम यात पाच जणच होते. मग पुढे त्यात अनेकजण सामील झाले या लोकांनी अशा शपथा घेतल्या होत्या की, नानासाहेबांच्या वंशाखेरीज इतर कोणास नमस्कार करावयाचा नाही, आणि अशी योजना आखली की गंगाबाईस माहेरी जाण्याच्या निमित्ताने पुण्यातून काढून साताऱ्यास नानांच्या ताब्यात ठेवायची, अनुकूल संधि पाहून तिच्या नावाची द्वाही

फिरवायची, तिला जो पुत्र होईल त्याच्या नावाने, किंवा पुत्र न झाल्यास तिच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाई चालवायची, बापूस वडिलकीचा मान देऊन नानास त्यांचा दुय्यम म्हणून नेमायचे, त्रिंबकरावाने सेनापतीचे काम करून निजाम व भोसले यांना अनुकूल करून घ्यायचे, अशा प्रकारची ही मसलत होती नारो अप्पाजींच्या मदतीने बापूंनी गंगाबाईस सुखरूप पुरंदरी ठेविले. (३०–१–१७७४).

बापू व नाना यांनी एक जाहीरनामा काढून सर्व लोकांस कळविले की, "राघोबास राज्यपद मिळण्यास शास्त्र व रूढी यांचा काहीच आधार नाही. नारायणरावांच्या खुनास त्याचीच भर असल्यामुळे तो बंडखोर व देशद्रोही आहे. तेव्हा सर्व लोकांनी त्यास मदत न करता गंगाबाईच्या पक्षास मिळावे." पुरंदरच्या बंदोबस्तास कोणीतरी लायक, चलाख, विश्वासू माणूस हवा होता बापूंनी पुरुषोत्तम दाजी पटवर्धन यास बोलावून आणून त्याजकडे ही कामगिरी सोपविली. त्यांनी ती उत्तम रीतीने, सावध राहून पार पाडली. प्रसूत होईतोपर्यंत गंगाबाईस विषप्रयोग किंवा मारेकरी यांची भीति होती. परंतु पुरुषोत्तम दाजीने ही जबाबदारी अंगावर घेतल्यामुळे बापू व नाना यांना पुणे सोडून दौऱ्यावर जाता आले.

त्या वेळी भेदभाव विसरून पेशव्याचे सर्व सरदार एक झाले. कारण ते सर्व राघोबावर चिडले होते. काही झाले तरी पेशवाई राघोबास पचू द्यावयाची नाही असे त्यांनी ठरविले. इतक्यात निजाम व हैदर गडबड करू लागले म्हणून राघोबा प्रथम निजामावर चालून गेला. बारभाईतील मंडळी त्याच्या स्वारीबरोबर होतीच. पुढे काहीतरी निमित्त करून ती मंडळी पुण्यास आली. त्यांनी पुणे आपल्या ताब्यात घेतले. हरीपंताने साताऱ्यास जाऊन छत्रपतीकडून राघोबास पदच्युत करविले आणि पेशवाईची वस्त्रे गंगाबाईच्या व कारभाऱ्यांची बापू व नानांच्या नावे घेतली. फेब्रुवारी २७ रोजी छत्रपतींचे आज्ञापत्र निघाले ते असे— "रघुनाथ बाजीराव यांनी नारायणराव पंडित प्रधान याजवर कसाला केला, ही गोष्ट धर्म राज्यात अयोग्य झाली पुढे पेशवाईची वस्त्रे मागितली ती संकट जाणोन पाठविली. परंतु पेशवाईची मर्यादा अगदीच राहिली नाही. यास्तव त्याज-

कडील पेशवाई दूर केली असे. हल्ली भवानराव, त्रिबकराव सावंजी व वामनराव गोविंद हे स्वामीच्या लक्षात आहेत तरी तुम्ही त्यांचे लक्षात वागून स्वामी सेवा करून दाखविणे.'

हे आज्ञापत्र तमाम राज्यातील मुख्य अडतीस इसमास काढण्यात आले त्यामुळे कारभाऱ्यांच्या उपक्रमास चांगलाच जोर आला. सखाराम बापू व नाना फडणीस हे दोघे कारभारी झाले. त्यांनी शिंदे होळकरादि सरदारांस पत्रे लिहून सर्व मसलत कळविली. निजामाशी सख्य केले फौज वगैरे ठेवून बंदोवस्त केला. या सगळ्या बातम्या राघोबाच्या कानावर गेल्या. तेव्हा तो तसाच पुण्याकडे वळला. त्रिंबकराव मामा व हरिपंत फडके त्यास आडवे गेले. मामांची व राघोबाची लढाई होऊन त्यात मामा पडले. तेव्हा सर्व भार हरिपंतांवर पडला. हरिपंत, भोसले, निजाम राघोबाच्या पाठीस लागले. राघोबा बऱ्हाणपुराकडे पळू लागला इतक्यात १८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाईस मुलगा झाला त्याचे नाव माधवराव ठेविले. पण त्याला सवाई माधवराव म्हणू लागले. तो ४० दिवसांचा होताच कारभाऱ्यांनी त्याच्या नावाने पेशवाईची वस्त्रे आणिली, तेव्हापासून सवाई माधवरावाची कारकीर्द समजतात.

तिकडे राघोबा माळवा, खानदेश, धार, उज्जेन, गुजराथ वगैरे प्रांतात पळतच होता हरिपंत त्याचा पिच्छा पुरवीत होता. हरिपंताने त्याचा एक दोनदा पराभव केला शेवटी सुरतेस जाऊन तो इंग्रजांच्या आश्रयास राहिला. पुन्हा इंग्रज मराठे युद्ध जुंपले. इंग्रजांचा मोठा वीर 'इष्टूर फाकडा' हा चकमकीत पडला. वडगावचा तह झाला. इंग्रजांनी साष्टीसुद्धा सगळा मुलुख परत देण्याचे कबूल केले व राघोबास मराठ्यांच्या ताब्यात दिले (१७७९)

हा तह झाला खरा, पण पुन्हा राघोबा भडोच येथे इंग्रजांच्या आश्रयाला गेला. पुन्हा इंग्रज मराठे युद्ध जुंपले. हे युद्ध सुमारे दोन वर्षे चालले होते. शेवटी महादजी शिंद्यांच्या मध्यस्थीने सालबाई येथे पुन्हा तह झाला (१७८३) इंग्रजांनी साष्टीशिवाय सर्व प्रांत मराठ्यास परत द्यावा,

राघोबास पेशव्यांच्या स्वाधीन करावे, तसेच इंग्रज व मराठे यांनी एकमेकांच्या शत्रूंशी दोस्ती करू नये असे ठरले. पुढे राघोबा आपल्या बायकामुलांसह कोपरगावी जाऊन राहिला व तेथेच त्याचा ११-१२-१७८३ ला अंत झाला.

सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत नाना व बापू हे दोघेही कारभार पहात. दोघांत लहान मोठेपणा राहू नये म्हणून प्रत्येक आर्थिक बाबीवर नाना फडणीस 'देवविणे' असा शेरा मारून शिफारस करीत, मग 'देणे' असा शेरा लिहून बापू ती बाब पूर्ण करीत. नानांनी व बापूंनी छोटया पेशव्यांचे संगोपन केले. इंग्रजांशी युद्ध केले. त्यांना दाद लागू दिली नाही. पुरंदरचा तह व वडगावची लढाई ही त्यांच्या कर्तबगारीची उदाहरणे देता येतील. बापूंचा ओढा मात्र रघुनाथरावाकडेच जास्त होता. वडगावला इंग्रजांशी तह झाला. त्या तहाप्रमाणे इंग्रजांनी रघुनाथरावांना महादजी शिंदे यांच्या ताब्यात दिले. नाना व शिंदे यांनी फितूर मंडळींच्या बंदोबस्ताची मोहीमच काढली. त्यात नारायणरावांचे मारेकरी मारले. दादांचे कारभारी चिंतो विठ्ठल रायरीकर यांनाही त्यांनी पकडले. चिंतो विठ्ठल यांच्याकडून सखाराम बापूंच्या फितुरीची माहिती महादाजी शिंदे यांना मिळाली. शिंद्यांनी रायरीकर व दादासाहेब यांच्याशी गोडीने वागून त्यांच्या पोटात शिरून सर्व माहिती काढून घेतली, एवढेच नव्हे तर बापूंच्या हातच्या फितुरीच्या चिठ्ठयाही त्यांना मिळाल्या. चिठ्ठीत मजकूर होता की, "विनती उपरी दक्षिणेकडे (हैदरअलीकडे) सूचना केली आहे. आम्हीही पाय पसरून बसलो आहोत, अशात जलदी कराल तितकी उपयोगी आहे."

शिंदे व नाना फडणीस यांनी सखाराम बापूंना त्यांच्या फितुरी कारवायाबद्दल कैद केले. त्यांची जहागिरी, जवाहीर, घोडी सर्व सरकार जमा झाले. नाना फडणिसांनी बापूंच्या जिंदगीची विल्हेवाट लावली. केवळ फितुरीबद्दल बापूंना ही शिक्षा देण्यात आली. निजामाने बापूंच्या अटकेबद्दल चौकशी केली. "सखाराम बापूंनी अविचाराने काही गंभीर स्वरूपाचा राजकीय गुन्हा केला असल्याने त्यांना कैदेत ठेवले आहे." असे कारभाऱ्यांनी उत्तर दिले.

निजाम, भोसले, गायकवाड, इंग्रज यांच्या दरबारामध्ये बापूंच्या शब्दास मोठा मान होता. पण बारभाईनंतर नाना बापूंच्या बरोबरीने राजकारणात चमकू लागले ही दरबारे नानास दबकून वागू लागली. बापूस नानांचा हा राजकारणातील वरचष्मा सहन होणे शक्य नव्हते या कारणामुळे बापूंच्या मनात नानांचे महत्त्व राजकारणातून अजिबात नाहीसे करण्याचे विचार घोळू लागले. बापू अतिशय खोल व दूरदर्शी असल्यामुळे त्यांनी आपल्या विचारांची परिस्फुटता 'करणे असेल अपाय तरी बोलून दाखवू नये, परस्परे प्रत्यय प्रचितीस आणावा !' या न्यायाप्रमाणे एकदम केली नाही, हळूहळू ते त्या उद्योगास लागले. मोरोबास पुढे करून नानांस चांगलीच प्रचिती आणून दिली. परंतु अशा प्रकारे परिस्थितीस कलाटणी देण्याच्या कामात मात्र दुटप्पीपणा, विश्वासघात, स्वार्थपरायणता यांचे माप त्यांच्या पदरात पडले तेच मोरोबाचे कारस्थान होय. सखाराम बापूंस पुढे नानांनी कैद केले असताना त्यांच्या व्यवस्थेकरिता नेमिलेल्या एका कारकुनाकरवी मोरोबाच्या कारस्थानासंबंधी माहिती बापूंच्या तोंडून काढण्याचा नानांनी प्रयत्न केला. त्यासबंधी इतिहाससंग्रहात एक पत्र श्री. पारसनीस यांनी छापले आहे. ते फार महत्त्वाचे आहे ते पत्र असे– "वृद्ध चिठ्ठ्यांचा वगैरे गोष्टी बोलतात, त्यात हे विनाअपराधी ऐसे दर्शवितात. बोलता बोलता मी ऐके दिवशी मागील पुसो लागलो, "बारभाईचे कारस्थान ठरविताना, तुम्ही, नाना, हरिपंत, परशुराम भाऊ, त्रिंबकराव वगैरे एकत्र होऊन तुमच्या व नानांच्या शपथा झाल्या कीं नाही ?" तेव्हा उत्तर केले, "जाहाल्या होत्या" "तर मग मोरोबाच्या मसलतीत बापूंचे अंग आहे असे लोक कां म्हणतात ?" त्याचे उत्तर केले, "गोपाळ नाईक चित्या वगैरेनी माझा पुकारा केला." मी म्हटले, "उगाच पुकारा होत नाही, काही असेल?" तेव्हा बोलिले, "मी नानाचे व मोरोबाचे ठीक करून देणार होतो." ते मी उत्तर केले, "पूर्वी मोरोबाच्या तुमच्या शपथा झाल्या नव्हत्या ? गंगाबाईस घेऊन यावयाचे सोबती दोघे, तिघे, तेवढ्यांचीच शपथ, मग त्यास अंतर देऊन मागतीबद्दल खाऊन भलतीकडेच जावे हे ठीक केले नाही "

त्यावर म्हणाले, "शपथ पूर्वी झाली खरी परंतु मध्ये दोन तीन गलबला जहाल्या. त्यामध्ये ती शपथ गेली " शब्दापलीकडे काही निघाले

नाही. त्यावर मी म्हटले, "गंगाबाईस आणण्याचे सोबती नाना व आपण ऐसे असता शपथ गलबलेत गेली हे कसे बोलता?" त्यावरून उगाच राहिले.

या पत्रातील उल्लेखावरून सखाराम बापू राजकारणात आणा-शपथा घेत परंतु त्या पाळण्याची फारशी फिकीर करीत नसत असे दिसते जेव्हा उच्च ध्येय राजकारणात नसेल तेव्हा स्वार्थ, स्वतःची कातडी शाबूत राखणे, हेच प्रत्येक माणसाचे ध्येय होऊन बसते मराठेशाहीच्या उत्तर काळात बहुतेक मुत्सद्द्यांचे हेच ध्येय दिसून येते. सारांश संघशक्ति कमी झाल्यामुळे मराठी साम्राज्याचा नाश झाला.

मोरोबाचे कारस्थान हा एक रिकामपणाचा खेळ होता. हे कारस्थान म्हणजे आपसातील फाटाफुटीचा, घरभेदेपणाचा एक नमुनेदार मासला होय हा खेळ खेळून बापूंनी काही राष्ट्रकार्य केले असे तर नाहीच, परंतु आजपर्यंतच्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीवर सर्वस्वी बोळा फिरविण्याचे कार्य मोरोबास हाताशी धरून त्यांनी केले असे म्हणावे लागते. व्यक्ति-अभिनिवेशास बळी पडल्यामुळे त्यांच्याबद्दल चोहोकडे वाईट मत झाले.

# प्रकरण ४ थे

सर्व कामात कमालीची सावधगिरी असावयाची. शत्रूस बोलण्यात किंवा लिहिण्यात कसलाच थांगपत्ता लागायचा नाही. परंतु मित्रासही अंगीकृत कार्य कळायचे नाही. सर्व मसलतीत अत्यंत खोलपणा, गुप्तपणा ठेवायचा. 'आधी केले मग सांगितले' असेच धोरण असावयाचे. स्वीकृत कार्यात धडाडी तर विलक्षणच. त्यात पराकाष्ठेची मेहनत, स्वदेशाभिमान होताच. परंतु स्वाभिमान सोडण्याची बिलकूल तयारी नव्हती. त्यांच्या स्वाभिमानास ज्याने धक्का लाविला तो आज ना उद्या रसातळास गेला हे नक्की समजावे. त्यासाठी नाना हिकमती लढवतील, सर्वस्व भरीस घालतील, "कारण पारिपत्याशिवाय धास्त पडत नाही" ही ठाम समजूत प्रतिस्पर्ध्यांना नमविण्याची बुद्धि फार, यामुळे सर्व आयुष्यभर अहमहमिकेची शर्यत खेळावी लागली.

बापूंना सिहगडावर कैदेत ठेविले. कैदेतही त्यांची बडदास्त चांगली ठेवली होती दूध पिण्यासाठी त्यांना एक गाय व म्हैस पाठविल्याचे उल्लेख आहेत. त्यांच्या व्यवस्थेसाठी दोन नोकर दिलेले होते. नित्याच्या दानास दररोज दहा रुपये, व्यतिपाताचे दिवशी सव्वा दोन तोळे सोन्याच्या अठ्ठावीस पुतळ्या त्यांना मिळत. उत्तम जेवण, भाजीपाले, फळे, विड्याची पाने या सर्वांची सोय केलेली होती. सिहगडावरून पुढे त्यांना प्रतापगडावर व शेवटी रायगडावर नेण्यात आले. रायगडावरच बापू १७८१ च्या ऑगस्ट-मध्ये अतिसाराच्या विकाराने वारले. त्यांच्या उत्तरक्रियेसाठी नाना फडणिसांनी पाच हजार रु. खर्च केले. मरणसमयी बापूंचे वय सुमारे ६५ वर्षांचे असावे. त्यांची प्रकृति निकोप होती बापूंची दिनचर्या सांगणारे कागदपत्र उपलब्ध आहेत. बापू अरुणोदयाबरोबर उठत. प्रातर्विधी उरकून

शेकत बसत. पुन्हा चांगले ९ वाजेपर्यंत झोपत. मग उठून स्नान, संध्या पूजा, दुपारचे जेवण उरकून ते सोंगट्या फार आवडीने खेळत. दुपारी ते देवदर्शनास व पुराणास जात. संध्याकाळनतर ते कारभाराची कामे पहात. कारभारात त्यांचा ढिलेपणा फार चाले. राजकीय उलाढालीत देवाण घेवाण पद्धतीचा कारभार चाले. त्यांचे खाजगी वागणे कर्मठपणाचे नव्हते. ते शंकराचे भक्त होते. त्यांनी त्यांच्या हिवरे गावी शंकराचे देवालय खूप पैसे खर्च करून बांधले. सासवडला कऱ्हा नदीवर घाट बांधला. त्यांच्याकडे येणाऱ्या विद्वान्, गुणी जनांना ते देणग्या देत.

चांगल्या वस्तूंचा संग्रह करण्याची बापूंना हौस होती. काचेचे पेले, झुंबरे, गालिचे त्यांच्याकडे असत. बापूंसाठी उत्तम तांदूळ, उंची कापड, वस्त्रे, केशर, कस्तुरी, नारायण तेल, सुवर्ण वर्ख, लाकडी सामान, लांब-लांबच्या ठिकाणाहून येत असे. त्यावर जकात माफ असे. निजाम, हैदर, नागपूरकर भोसले, कोल्हापूरचे छत्रपती यांचेकडून बापूंना पोशाख व भेटी येत. बापूंना चहा पिण्याची चांगलीच सवय असावी असे दिसते चहाची सवय त्यांना मॉस्टीन, अॅप्टन इत्यादि इंग्रज वकीलांच्या सहवासाने लागली असावी. सखारामबापू रायगडावर कैदेत होते, त्यावेळी त्यांच्या खोलीत सुमारे चार पौंड चहा व चहादाणी इत्यादि वस्तू होत्या अशी माहिती जुन्या कागदपत्रांतून मिळते.

गृहसौख्याच्या बाबतीत मात्र बापू कमनशिबी होते. त्यांनी पाच लग्ने केली. बापूंना आकोपंत नावाचा एक मुलगा होता. बापूंच्या उतारवयात आकोपंत वारले. त्यामुळे बापूंना फार दुःख झाले. बापूंनी ते मोठ्या धैर्याने गिळले. आकोपंतांच्या मरणसमयी बारभाईचे कारस्थान ऐन रंगात आले होते. पुत्राच्या मृत्यूचे दुःख गिळून पंतांनी हाती घेतलेले काम नेटाने पुढे चालविले, यावेळी बापूंनी पुत्रवियोगाचे दुःख सहन करून बारभाईचे कारस्थान यशस्वी करण्यासाठी तनमनधन अर्पण केले. यासंबंधी एका पत्रात उल्लेख मिळतो तो असा-- "विनति उपरी, श्रीमंत राजश्री सखारामबापूंचा पुत्र आकोपंत बाबा याचा काल जाहला. जो मजकूर... मोठा घात झाला. याजमुळे सौ. ताईस मोठे दुःख झाले. ते लिहावयासी हात न चले. श्रीमंतास श्रम झाले. तो प्रकार काये ल्यहावा. तथापि मसलत

भारी पडली. याज मुळे उपाय नाही... नाही तरी येकादे तीर्थी जाऊन बसते, कोण्हाचे हाती न लागते. त्या सारखा ज्ञानी, विवेकी कोण्ही नाही. त्याचे तेच एक. यैसा पुरुष पुढे होणे कठीण. आम्हा सर्वत्रांची अवसाने झाडून गेली. तथापि त्यांनी अवसान धरून मसलत जैसी आरंभिली तैसी सीधीस न्यावी ऐसा निश्चय !"

आकोपंताच्या मृत्यूनंतर बापूंनी मुलांच्या आशेने तीन लग्ने केली; पण त्यांना मूल बाळ झाले नाही. बापूंच्या नवीन लग्नाबद्दल आनंदीबाईने त्यांना लिहिले "नवी भावजय लाडकी केली, तिचे नाव काय ठेविले ? दुसरी कधी करणार ?"

बापूंचा स्वभाव परोपकारी व दयाळू होता. तडजोडीने कार्यभाग साधण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. शत्रूची खुमखुमी जिरविण्याची ते हिम्मत धरीत. बोलण्यात आणि वागण्यात ते फार सावधगिरी बाळगीत. अनेक लढायांच्या प्रसंगी बापूंनी मुख्य कारभारीपणाची जबाबदारी फारच चांगल्या तऱ्हेने पार पाडली. अटकेपासून पांदेचरीपर्यंत व अहमदाबादे-पासून काशी, प्रयाग पर्यंत मोहिमांत प्रत्यक्ष वावरलेला बापूंच्या खेरीज दुसरा मराठी मुत्सद्दी नाही. भाऊबंदकीच्या वादाने मराठी राजवट न किडती तर बापूंची कर्तबगारी इतिहासात आणखी निराळीच दिसली असती. स्वारा कारभारी व धुरंधर मुत्सद्दी म्हणून सखाराम बापूंनी चांगलाच नावलौकिक आपल्या हयातीत संपादन केला. पेशव्यांच्या स्वाऱ्यांत बापू किंवा बापूंचे पथक नेहमी असे. बापूंनी स्वतः जातीने जशी पुष्कळ लढायांत चांगली कामगिरी बजावली आहे, तशीच राष्ट्राची वकिलीही मुत्सद्दीपणाने केलेली आहे यास्तव साडेतीन शहाण्यांत त्यांस अग्रस्थान देण्यात येते. शागिर्दी शिलेदारीपासून मुख्य कारभारी पदापर्यंत स्वतःच्या कर्तबगारीने चढणाऱ्या बापूंची योग्यता कुणीच नाकारणार नाही. बापूस निजामाकडून 'मदासल महाम' हा किताब मिळाला होता.

बापूंच्या मृत्यूसमयी तीन बायका हयात होत्या. बापूंची शेवटची बायको जिऊबाई व सून गोदूबाई यांना नानांनी वेगवेगळ्या नेमणुका करून दिल्या होत्या. जिऊबाई मरण पावल्यावर त्यांच्या सुनेने विधिपूर्वक दत्तक घेऊन त्याचे नाव यशवंत ठेविले.

# प्रकरण ५ वे

सखारामबापूंच्या चातुर्याच्या व हजरजवाबीपणाच्या पुष्कळ आख्यायिका आहेत त्यातील काही अशा--

(१) श्रीमंत भाऊसाहेब यांनी पुणे शहरास कोट बांधावयास आरंभ केला व बापूंस विचारले, "बापू, तुम्ही कोट पाहिला की नाही ?" बापूंनी उत्तर दिले, "कोट पाहिला आहे परंतु अकलेची मजबुती फारच कमी दिसली." तेव्हा श्रीमंतांनी "कां" म्हणून विचारले. बापूंनी सांगितले की, "शत्रू कोटापाशी दाखल होईल तेव्हा कोटाचा उपयोग; परंतु जो राजा आपले शहरापावेतो शत्रू येईपर्यंत बातमी ठेवणार नाही त्यास कोटाचा उपयोग तरी कसा होणार ? राजाने दोन चारशे कोसांवर शत्रू आहे तोंच त्यावर नजर देऊन त्याचा प्रतिबंध केला पाहिजे. आणि इतक्या दूर अंतरावर शत्रू असता जर बंदोबस्त करावयाचा तर मग कोट कशास पाहिजे ?" ही तक्रार श्रीमंतांच्या लक्षात येऊन कोट बांधण्यास मनाई केली. या कोटाची खूण अद्याप नागझरी जवळ आहे.

(२) एके दिवशी माधवराव बल्लाळ पेशवे हे स्वत: चंद्रचूड यांचे कारकुनापाशी हिशेब समजावून घेत होते. इतक्यात काही तक्रार पडली. त्यावरून कारकून बोलला की, "आम्ही या प्रमाणे आजपर्यंत करीत आलो. आता आपण नवे यजमान जाहला. तुमच्या ध्यानात येत नाही. याचे कारण "जुने तमाशे व नवे डोळे ! त्यांस आम्ही काय करावे ?" असे बोलताच श्रीमंत रागास येऊन त्यांनी, "जास्ती बोललास तर तोंड फोडीन," असे बोलून वर हात उचलला, तो पाठीमागे सखाराम बापू होते. त्यांनी हात

धरला. तेव्हा श्रीमंत पाठीमागे पाहून बोलले, "हात कां धरलात ?" तेव्हा बापू म्हणाले, "सरकारचा जो हात दिल्लीचे बादशहा, लखनौचे वजीर, हैदराबादचे निजाम यांच्यावर पडायचा तो गरीब ब्राह्मणावर पडेल तर ठीक दिसणार नाही. म्हणून मागचे मागे हात धरला. मग श्रीमंतांची मर्जी असेल तसे !" श्रीमंत खूष झाले.

(३) एके समयी इंग्रजांनी बोलणे लावले की, आमचा वकील पुण्यास असावा. तेव्हा दरबार भरला. तमाम मुत्सद्दी व सरदार यांस पाचारण केले. त्या वेळी सखाराम बापूंनी सांगितले की, पेशव्यांचा वकील इंग्लंडास ठेवावा व इंग्रजांचा वकील पुण्यास आणावा. तर बरोबरी होईल. एकपक्षी वकील घेतल्यास आपले घरचा भेद बाहेर जाईल व दुसऱ्याचे घरचा भेद मात्र आपणांस कळणार नाही, व येणे करून आपल्या राज्याचा मात्र तोटा होईल."

(४) एके दिवशी एक गरीब द्रविड ब्राह्मण बापूंकडे काही संभावना होईल या हेतूने आला. बापू या वेळी सासवडास राहत होते. ब्राह्मणाने दक्षणेची गोष्ट काढताच बापूंनी त्यांना, 'नाही' किंवा 'होय' असे काहीच ठाम उत्तर दिले नाही. परंतु पुरंदरकडे बोट दाखवून नानांस भेटावयास सांगितले. ब्राह्मण त्या प्रमाणे पुरंदरास जाऊन नानांस भेटला. परंतु नानांनी त्यास बापूंस भेटावयास सांगितले. अशा तऱ्हेने एकमेकांनी एकमेकांकडे जाण्यास सांगितल्यामुळे ब्राह्मण हेलपाटे घालून दमला. त्याच्या हातात काहीच पडले नसल्यामुळे त्याने पुढील विनोदी श्लोक रचला.—

"गडाच्च सासवडं यामि सासवडाच्च पुनर्गडम् ।
गडसासवडयोर्मध्ये द्रविडो लुडबुडाम्यहम् ।।

—मोरोबाच्या कारस्थानापुरती बापूंची एकंदर वर्तणूक पाहिली असता असेच वाटते की बापूंचे हे सर्व 'साठी बुद्धि नाठी' चे खेळ होते. सवाई माधवराव अल्पवयी असल्यामुळे बापू, मोरोबा, नाना यांचे असे खेळ चालू शकले या वेळी दौलतीस अपाय होईल ही गोष्ट बापूंस समजूनही उमजली नाही नानांचा पाडाव करण्याच्या भरात आपण काय करीत आहोत याचे त्यांना भान राहिले नाही.

# देवाजीपंत चोरघडे

देवाजीपंत यांचे संपूर्ण नाव दिवाकर पुरुषोत्तम चोरघडे असे आहे. हे महाराष्ट्रातील साडेतीन शहाण्यापैकी एक असून ते नानासाहेब पेशव्यांच्या आमदानीत उदयाला आले. देवाजीपंत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून नागपूर जिल्ह्यात नरखेड येथे राहणारे. त्यांचे प्रत्यक्ष वंशज कोणी राहिले नसून त्यांचे भाऊबंद नरखेड व नागपूर येथे आहेत.

कान्होजी हा रघुजीचा चुलत आजोबा. बाजीराव हा माळव्यात असता 'सेना साहेब सुभे' कान्होजी भोसले याने शाहू महाराजांची अवज्ञा केली, त्यावरून महाराजांची त्यावर इतराजी झाली व त्यांनी त्याला साताऱ्यास कैद करून ठेविले. पुढे महाराजांनी त्याचा अधिकार रघुजी भोसले यास दिला. हा रघोजी भोसले महाराजांबरोबर नेहमी शिकारीस जात असे. शिकारीच्या वेळी एकदा त्याने वाघास मारून शाहू महाराजांचा प्राण वाचविला होता. त्यामुळे त्याच्यावर त्यांची विशेष भक्ति असे. तसेच महाराजांनी आपल्या मेव्हणीशी त्याचे लग्न करून नातेही जोडले. त्यावरून त्यास महाराजांनी कान्होजीच्या मागे त्याच्या अधिकारावर नेमिले. त्या वेळी त्याच्याकडून लेखी करार करून घेतला की, "रघुजीने ५००० स्वारानिशी नेहमी गादीची सेवा करावी. ९ लाख रु सरकारी पोत्यास पाठवावे, शिवाय घासदाणा आदि करून जी बक्षिसी मिळेल ती 'सरकारात निम्मी द्यावी. पेशवा कधी मोहिमेवर निघाला तर त्याने १०,००० स्वार त्याच्या मदतीस द्यावे." कान्होजी मरेपर्यंत साताऱ्यास कैदेत होता

रघुजीला वऱ्हाडच्या सुभ्यावर नेमून 'सेना साहेब सुभा' केले. रघुजी पराक्रमी व राजकारणी होता. त्याने गोंड राजाकडून नागपूर जिंकून तेथे

आपली राजधानी केली. कर्नाटकातही शौर्य गाजवून त्यांनी लौकिक मिळविला. रघुजी राजे इ. स. १७५५ साली वारले. रघुजी राजे भोसल्यांचे प्रमुख साहाय्यकर्ते कोन्हेरराम व भास्करराम कोल्हटकर होते. एक होते कारभारी तर दुसरे होते सेनापती. रघुजीला चार पुत्र होते. जानोजी व मुधोजी हे चांगले कर्ते होते. रघुजीने मरणापूर्वी वडील पुत्र जानोजी याने 'सेना साहेब सुभ्याचा' मुख्य अधिकार चालवून बाकीच्या तिन्ही मुलास राज्यात वाटणी देऊन त्यांचा परामर्श घ्यावा, असे सांगितले होते. आपली योजना त्यांनी पेशव्यांनाही कळविली होती. कोन्हेरराम कोल्हटकर याजपाशी देवाजीपंत शागीर्द होते त्रिंबकजी राजे भोसले व भास्करराव कोल्हटकर यांच्या संगतीत राहून देवाजीपंत हुशार, चतुर सल्लागार झाले. देवाजीपंत जानोजीचे सल्लागार झाले.

जानोजी सर्वांत वडील असल्यामुळे त्यासच सेना साहेब सुभ्याची वस्त्रे मिळणे योग्य आहे असे त्यांच्या कुटुंबातील मंडळींनी ठरविले आणि त्याप्रमाणे जानोजीस वस्त्रे मिळविण्याकरिता त्रिंबकजी राजे भोसले व बाबूराव कोन्हेर या दोघास पेशव्याकडे पाठविले. त्या वेळी देवाजीपंत पण त्यांचेबरोबर पुण्यास गेले. त्या वेळच्या वहिवाटीप्रमाणे राजास नजराणा दिल्याशिवाय वस्त्रे मिळत नसत. देवाजीपंतांच्या मध्यस्थीने अडीच लक्ष रु. नजराणा ठरला. तो घेऊन पेशव्यांनी जानोजीस 'सेना साहेब सुभा' पदाचे वारसदार म्हणून मान्यता दिली. याबद्दल भोसल्यांच्या बखरीत एक मनोरंजक आख्यायिका लिहिली आहे, ती अशी—

'त्रिंबकजी राजे, कोन्हेरराम पुण्यास गेले तेव्हा देवाजी पंत पण पुण्यास गेले नानासाहेब पेशवे व त्रिंबकजी राजे याचे नजराण्याबद्दल जे बोलणे चालले होते, ते सर्व यांनी लक्ष देऊन ऐकले. एकदा राजे व बाबूराव रात्री घरी परत आले. देवाजीपंत पेशव्यांचे वाड्यात निजलेले होते. ते तसेच राहिले होते. राजे गेल्यानंतर हा निजलेला कोण? म्हणून त्यांना उठविले. नानासाहेबांशी त्यांचे बोलणे, चालणे झाले. त्यात देवाजी पंतांची हुशारी चांगलीच दिसून आली. त्यामुळे ते नानासाहेबांच्या मनात भरले. त्यांच्याशी एकांती बोलणे, चालणे होऊ लागले.

शाखा.
क्र. २००९
विषय

चाणाक्ष देवाजीपंतांनी जाणले की, त्रिबकजी व बाबूराव हे दीड लक्षापर्यंत नजराणा ठरविण्याच्या तजविजीत आहेत. त्रिबकजी व बाबूराव हे यानंतर जानोजीस विचारून नजराण्याची रक्कम नक्की ठरविण्याकरिता नागपूरास परत आले व जानोजीस ७ लक्षांपर्यंत नजराण्याची रक्कम ठरेल असे सांगू लागले. देवाजींच्या ध्यानात ही लवाडी येताच त्यांनी जानोजीस भेटून 'मजकडे हे काम दिल्यास मी नजराण्याची रक्कम अडीच (२॥ लक्ष) लक्षावर ठरवून आणतो.' असे जानोजीस सांगितले.

जानोजीनेही यात आपला बराच फायदा होईल असे जाणून देवाजी-कडेच हे काम दिले. देवाजीपंतांनी पुण्यास जाऊन नानासाहेब पेशव्यांस सांगितले की, "त्रिबकजी व बाबूराव १॥ लक्ष देतो म्हणतात, तर मी जानोजीकडून २॥ लक्ष रु. देववितो." पेशव्यांना एक लक्ष रु. फायदा होत असल्यामुळे त्यांना ही गोष्ट पसंत पडली. देवाजींच्या मध्यस्थीने अखेर २॥ लक्ष नजराणा ठरून पेशवे व जानोजी या दोघांची मर्जी देवाजीपंतावर बसली. तो नजराणा घेऊन पेशव्यांनी जानोजीस 'सेना साहेब सुभा' पदाचे वारस म्हणून मान्यता दिली. परंतु जानोजीस कायदेशीर सनद सन १७६१ मध्ये ताराबाईचे हातून माधवरावांचे कारकिर्दीत मिळाली.

वरील मध्यस्थीमुळे पेशवे दरबारी व जानोजीकडे देवाजीपंतांची पत वाढली. पण पुढे भोसल्यांच्या घरात भाऊबंदकीची भांडणे व कटकटी सुरू झाल्या. बाहेरच्या मोहिमा व मुलुखगिऱ्या बंद पडल्या. जानोजी भोसले यांचा भरवसा देवाजीपंतावर फार होता. त्यामुळे मुधोजी पेशव्यां-कडे वारंवार तक्रार करी. जानोजीचे पक्षपाती दिवाकरपंत व बाळाजी केशव हे नागपुरास होते दोघा भावामध्ये तह ठरला. मुधोजी अप्पाने सर्व कारभार करावा व रघुजी करोडे, त्रिबकजी व पिराजी निंबाळकर या तिघांनी दोघां भावांचे दरम्यान पुढे तेढा होऊ न द्यावा, असे ठरले. या दोघा भावांना उदगीरच्या लढाईत पेशव्यांनी सैन्यासह बोलविले होते. परंतु मध्यस्थांच्या आग्रहावरून वरप्रमाणे ठराव झाला. जानोजी व मुधोजी यांच्या सैन्याचा उपयोग उदगीरच्या लढाईत पेशव्यांना झाला नाही."

 

सन १७५९–६० च्या सुमारास भोसल्यांच्या घरात फार मोठा गृहकलह सुरू झाला होता. त्या कटकटीत उतरण्याचे काम पेशवे आपल्या परीने करीत होते. परंतु याच वेळी म्हणजे सन १७६१ मध्ये पानिपत स्वारीचा मनसुबा उभा राहिला. शेवटी पानिपतवर प्रचंड पराभव झाल्यामुळे पेशव्यांना स्वत:चेच घर आधी सावरण्याचा प्रसंग आला. अर्थात् या वेळी नागपूरकर भोसल्यांच्या कलहाचे पेशव्यांना विस्मरण झाले असले तर ते क्रमप्राप्तच होते. पण आनंदाची गोष्ट ही की थोरले माधवराव हे पेशवे झाले, व त्यांनी पेशवाई सावरली एवढेच नव्हे तर त्यांनी पानिपतचा सूड पुरेपूर घेतला.

पानिपतच्या स्वारीत नागपूरकर भोसले सामील झाले नाहीत, उलट आपल्याच स्वार्थी हेतूसाठी त्यांनी निजामाशी संगनमत केले. मराठी राज्याचे धनी सातारकर छत्रपतींची गादी, तुम्ही भोसल्यांचे भाऊबंद म्हणून तुम्हास मिळवून देतो, असे मोठे आमिष निजामाने भोसल्यास दाखविले पण शेवटी माधवराव पेशव्यांनी अत्यंत चतुरपणाने भोसल्यांना शुद्धीवर आणले. त्या वेळी पेशवे व भोसले यांच्यात करार झाला. त्याअन्वये ३२ लक्षांची नेमणूक भोसल्यांना करून देण्यात आली, व त्या बदल्यात भोसल्यांनी आपल्या सैन्यासह पेशव्यांच्या मदतीस जावे असे ठरले. पण भोसल्यांनी तो करार पाळला नाही. राक्षसभुवनच्या लढाईच्या वेळी जानोजी भोसले पेशव्यांच्या मदतीला आले नाहीत. निजामाशी युद्ध चालू असल्यामुळे माधवरावांनी आपला राग आवरला. नंतर राक्षसभुवनची लढाई आटोपली पेशव्यांचा जय झाला, निजामाचा त्रास संपला या विजयानंतर झालेल्या तहात पेशव्यांनी निजामाला संकटप्रसंगी मदत करण्याचे कबूल केले.

राक्षसभुवनच्या लढाईत निजाम निर्बल झाला. तेव्हा भोसल्यांनी निजामाच्याच मुलखात स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. पण निजामाने पेशव्यांची मदत मागितली. कारण राक्षसभुवनच्या लढाईनंतर निजामाशी असलेले वैर तात्पुरते तरी संपले होते. म्हणून माधवराव पेशव्यांनी निजामाची फौज घेऊन ते वऱ्हाडात घुसले. हे अरिष्ट बघताच

भोसल्यांना देवाजीपंतास राघोबा दादाकडे सल्ल्याचे बोलणे करण्यास पाठविले.

देवाजीपंताने दादांच्या पायी डोई ठेवली व दादांची मर्जी बहुत प्रकारे प्रसन्न करून घेतली. त्यांना जानोजीची चिठ्ठी दिली. चिठ्ठीत लिहिले होते, "आपण वडील, आपणावर राज्यकारभार आहे. आम्ही लेकरे, लेकरूपणाची आळ चालवावी." देवाजीपंताने अत्यंत लीनता दाखविली. दादासाहेब भोळे, ते स्तुतीला भाळले आणि त्यांनी भोसल्यांना अभय दिले. दादासाहेबांच्या या हस्तक्षेपामुळे माधवरावांचा हिरमोड झाला. डोईजड झालेल्या जानोजीला नरम करण्याची संधी गेली. तहाची बोलणी चालली. पूर्वी जहागिरी म्हणून दिलेला ३२ लक्षाचा मुलूख परत घ्यावा असे माधव-रावांचे सांगणे होते. त्यांनी २४ लक्षांचा मुलूख सरकारमध्ये जमा करून फक्त ८ लक्षांचा मुलुख जानोजीकडे ठेविला. या स्वारीमुळे निजामाच्या तक्रारी मिटल्या व जानोजी रघुनाथरावाबरोबर उत्तरेस स्वारीस गेले व रावसाहेब पुण्यास परत आले.

माधवरावांनी कडक धोरण स्वीकारलेले पाहून भोसले व देवाजीपंत घाबरले हिशोब आणि इतर बाबींचा खुलासा करण्यासाठी माधवरावांनी देवाजीपंतास पुण्यास बोलाविले तेव्हा देवाजीपंत पुण्यास आले. ते हिशाबाची कामे समजावून देत असताना इतर घडामोडीवर लक्ष ठेवीत. पुढे माधव-रावांनी एक धाडसी बेत केला. निजाम, भोसले व मराठे या सर्वांची एकजूट करून इंग्रजावर स्वारी करावी. पण देवाजीपंतांनी हा बनाव आपल्या मालकाला कळवून असा बदसल्ला दिला की इकडे पेशवे इंग्रजावर मोहीम करतील तेव्हा पेशव्यांवर झडप घालावी पण माधवरावांच्या गुप्त हेरांनी ही बातमी पकडली आणि देवाजीपंताची पुणे दरबारात फार अप्रतिष्ठा केली. पुढे पेशव्यांनी भोसल्यावर स्वाऱ्या करून त्यांना अगदी दीन करून सोडले. जानोजीने पेशव्यांशी नमते घेऊन देवाजीपंतास कारभारातून काढून टाकण्याची पेशव्यांची आज्ञा त्याने मान्य केली व देवाजीपतास स्वतः आपल्या कैदेत ठेविले. पुढे भोसले शरण येऊन माधवरावांच्या हैदरावरील

कर्नाटक स्वाऱ्यास आपल्या फोजेनिशी पेशव्यांच्या बाजूने लढण्यास तयार झाले.

देवाजीपंतास अटक झाल्यावर भोसले बंधूंचे तटे मिटले. माधवराव पेशवे व भोसले यांच्यात सलोखा वाढला जानोजी पुण्यास येऊन माधवरावाना भेटले. पण दुर्दैवाने माधवराव पेशवे व जानोजी भोसले लवकरच वारले. दिवाकरपंत फार कर्तबगार मनुष्य असून त्याच्याशिवाय भोसल्यांच्या खर्चाची तजवीज करणारा माणूस कोणीही नव्हता. भोसल्यास नेहमी पैशाची अडचण असून त्याकरिता फौजांचे धरणे नेहमी सुरू असे. परंतु दिवाकरपंत काही सावकार मंडळी व काही इतर मंडळी हाताशी ठेवून कशी तरी वेळ मारून नेत, परंतु अखेरीस प्रत्येकाचे मन त्यांचे विरूद्धच होत गेले. मुधोजीस वाटे की हाच जानोजीस बहकावतो. पेशव्यांस वाटे की याचेच सल्ल्याने जानोजी मोगलास व राघोबास मिळाला. म्हणूनच भोसल्यावरील दुसऱ्या स्वारीत देवाजीपंत पेशव्यांशी बोलणे लावण्याकरिता आले असता पेशव्यांनी त्यास पकडून आपल्या जवळ कैदेत ठेविले. परंतु जानोजीही त्यांच्या विरुद्ध उलटला. नागपूरचा पेशव्यांचा वकील विठ्ठल शामराज हा जानोजीशी त्याचे झालेले भाषण कळवितो. त्यात जानोजी म्हणतो "श्रीमंत कायम तर आमची दौलत कायम हे पुरती आमची समज आहे. पूर्वील सीलसीले चहुकडे जे झाले ते आम्हास बोलता नये. परंतु हे इतके ही कृत्य माझे नव्हे. हे दिवाकरपंतांनी चहूकडे सूत्रे ठेविली होती. म्हणूनच देवाजीपंतास घरी बसविले." दिवाकरपंतास उतरती कळा लागली, काही दिवस ते अडचणीतच राहिले.

परंतु पुढे कलकत्तेकर इंग्रजाच्या व भोसल्यांच्या दरम्यान ज्या मसलती होत होत्या त्यात दिवाकर पंतांची जरूर भासू लागली. ते त्या खटपटीस लागले. मुधोजीने देवाजी पंतास कैदेतून काढून त्यांस पुन्हा दिवाणगिरी दिली. याच सुमारास मुधोजीशी हेस्टिंग्ज याने कारस्थान चालवून आपणाकडे मुधोजीस मिळवून घेतले. कनकापुरच्या तहाप्रमाणे व एकंदर राजकारणाच्या दृष्टीने मुधोजीने परभारे दुसऱ्याशी राजकारण करणे व तेही मराठ्यांच्या शत्रूशी हे गैर होते. नाना फडणिसाने मुधोजीचा भाऊ बिंबाजी यास

चिथावणी लाऊन पुन्हा गृहकलह उभा केला. दिवाकरपंत पुन्हा मुधोजीचा कारभारी झाल्यामुळे महिपतराव दिनकर, व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी ही मडळी मागे पडली. त्रिबाजीस ३२ लक्षांचा मुलूख व वऱ्हाणपूरचा किल्ला राहण्यास द्यावा असे नानांनी कबूल केले.

आपल्या घरातील फंदकितुरी कळताच मुधोजीने नानांशी सलोखा करण्याकरिता दिवाकरपंतास पुण्यास रवाना केले. नाना फडणिसाने निजाम व हैदर यांचेशी इंग्रजाविरुद्ध कारस्थान रचले असून भोसल्यांनी कलकत्तेकर इंग्रजावर चाल करून या जुटीत सामिल व्हावे असे ठरले ते सर्व कबूल करून देवाजीपंत नागपुरास परत गेले. दिवाकरपंत हेस्टिंग्जला भेटण्यास काशीस गेले पण भेट झाली नाही. दिवाकरपंत सन १७८१ मध्ये नागपूर येथे वारले. मरणसमयी ते ८१ वर्षांचे होते. त्यांना औरस पुत्र नसून कोकाबापू नावाचा एक दासीपुत्र होता. चिमूर येथे देवाजी पंतांनी बांधलेली देवळे आहेत. त्यांच्या जवळ पुष्कळ द्रव्य होते. परतु ते मरताच त्यांची सर्व इस्टेट मुधोजीने भरून आणली. जानराव नावाचा एक मनुष्य देवाजीपंतां-जवळ होता. जानरावावर मुधोजीची मर्जी बसली. पुढे इंग्रज मराठ्यांचे युद्ध होऊन त्यात शिंदे यांनी मध्यस्थी केली. सालबाईचा तह होऊन हे युद्ध थांबले. देवाजीपंत १७८१ पर्यंत हयात होते. त्यांनी आपली सर्व शक्ति व बुद्धि पेशव्यांचा ऱ्हास होण्यासाठी वापरली. असे होते राष्ट्रघातकी देवाजीपंत.

देवाजीपंतांच्या काही दंतकथा ऐकण्यात आहेत त्यातील एक—

माधवरावांनी दादासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शनिवार-वाड्यात नजर कैदेत ठेवले. त्या वेळी हैदरावरील स्वारीची माधवराव योजना करीत होते नागपुरचे भोसले फौजेसुद्धा येत आहेत असा निरोप घेऊन देवाजीपंत पुण्यास आले. पेशव्यांची त्यांनी गाठ घेतली. भेटीच्या वेळी माधवरावांची परवानगी घेऊन देवाजीपंतांनी सखाराम बापूंची भेट घेतली. भेटीच्या वेळी माधवरावांच्याकडील कारकून हजर होता. बापू व पंत खेकटी खेळविण्यात प्रवीण ! भेट झाली तेव्हा बापू बुद्धिबळे खेळत होते. राजकीय बाबीबद्दल कारकूनाच्या समक्ष बोलणे कठीण होते. बापूंनी एक

खेळी मोठ्याने सांगितली. "आमची प्यादी पुढे सरकत आहेत तर तुमचा राजा तूर्त दोन घरे मागे न्यावा." चतुर देवाजीपंतांनी बापूंच्या बोलण्याचा अर्थ ध्यानी घेतला. जानोजी भोसल्यास पत्र पाठवून त्यांना नागपुरला परत जाण्यास सुचविले.

पुण्यास येत असलेले भोसले नागपुरला परत फिरले पेशव्यांच्याकडे तसे वर्तमानही आले माधवरावांनी पंतांना याबद्दल विचारता पंत म्हणाले, "भोसले आता येतील." माधवरावांनी सखाराम बापू आणि देवाजीपंत यांचे बोलणे शब्दन् शब्द हजर असणाऱ्या कारकूनाकडून समजावून घेतले. त्यातला अर्थ पेशव्यांच्या ध्यानी आला. त्यांनी देवाजीपतांना बोलावून आणले. कचेरीत त्यांची मानगूट पकडली. हातात नंगी तलवार घेऊन, "तूं हे कृत्य बापूंच्या सांगण्यावरून केलेस किंवा नाही?" असे रागाने विचारले. "खोटे बोललास तर मुडदा पाडीन." असेही पेशवे म्हणाले. रावसाहेबांचा राग पाहून देवाजीपंतांनी आपली चूक कबूल केली. आणि भोसल्यांना परत पत्र पाठवून पुण्यास बोलावून घेतले. देवाजीपंत मात्र पेशव्याजवळची पत गमावून बसले.

नारायणरावांच्या खुनानंतर झालेल्या बारभाईच्या कारस्थानात देवाजीपंतांनी नाना-बापूंना काही मदत केली होती. भोसल्यातर्फे इंग्रजा-बरोबर कारस्थाने करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. पण नाना फडणिसांनी मोठ्या चातुर्याने त्यांचा बंदोबस्त केला. असे होते साडेतीन शहाण्यांतील एक शहाणे दिवाकरपंत ऊर्फ देवाजीपंत चोरघडे.

# विठ्ठल सुंदर

विठ्ठल सुंदर हे पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक होत. ते हैद्राबादच्या निजामाकडे नोकरीस होते. यांचे संपूर्ण नाव विठ्ठल सुंदर परशुरामी असे आहे. हे देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण असून मोठे बुद्धिमान् व महत्त्वाकांक्षी होते. पोट भरण्यासाठी ते संगमनेरहून पुण्यास आले त्यांना नानासाहेब पेशव्यांच्याकडे नोकरी मिळाली. त्यात त्यांच्या अगदी निकटच्या परिवारात ते काम करीत असत एके दिवशी नानासाहेब पेशवे विठ्ठल सुंदरांना म्हणाले, "माध्यंदिना बुद्धि हीना:" ते ऐकून विठ्ठल सुंदराना अतिशय राग आला त्यांना तो अपमान सहन झाला नाही त्यांनी ताबडतोब नोकरी सोडून आपल्या गावची म्हणजे संगमनेरची वाट धरली पण मनात मात्र पेशव्यांनी केलेल्या अपमानाचा सूड घेण्याचे त्यांनी ठरविले.

त्या वेळी निजामाच्या राज्यात बरेच मराठे लोक कामावर होते. विठ्ठलपंताना पेशवाईपेक्षा निजामाचे राज्य जवळचे वाटले त्यांनी रामदास-पंत यांचेकडे कारकुनाची नोकरी धरली हे रामदासपंत निजामाचे दिवाण होते. ते अतिशय हुशार, धाडसी व कारस्थानी होते. ते थापा मारण्यात फार पटाईत होते रामदासपंतांची डुप्ले व बुसी यांच्याशी कारस्थाने चालत. ते वैभवसंपन्न होते. रामदासपतांनी ताराबाई, पेशवे व निजाम या सर्वांना झुलवीत ठेविले होते. सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत याचा पुतण्या सातार्‍याच्या गादीवर बसविण्याचे ताराबाईने ठरविले होते. रामदासपंतांचे उद्योग पाहून विठ्ठलपंत राजकारणात निष्णात झाले. ते लष्करी डावपेचातही तरबेज होते.

रामदासपंत यांच्या ओळखीने विठ्ठल सुंदरांना निजामअल्लीकडे नोकरी लागली त्यावेळी सलाबत जंग हा निजामाच्या गादीवर होता, तेव्हा त्याचा भाऊ निजामअल्ली आळसात सुखासीन जीवन जगत होता. त्याचा आळशीपणा, निष्क्रियता पाहून विठ्ठलपंतांना फार राग येई. निजामअल्लीला कर्तबगारीला मोठे क्षेत्र असून तो चैनीत लोळत पडतो त्यामुळे आपणाला कर्तबगारी करून दाखविण्यास वाव मिळत नाही. एक दिवस मनाचा निश्चय करून विठ्ठलपंतांनी निजामअल्लीची कान उघाडणी केली. निजामअल्ली खुषीत आहेत हे पाहून विठ्ठलपंत सौम्य शब्दांत त्यांना म्हणाले, "अशा प्रकारचे निष्क्रिय आयुष्य जगण्यात काही अर्थ नाही. काहीतरी पराक्रम करून दाखवा."

पंतांचे बोलणे ऐकून अल्ली म्हणाले, "मैं क्या करू ?"

"काय करू काय ? खावंद राज्य करा" पंत म्हणाले, पंतांचे बोलणे ऐकून अल्ली दचकले आणि पंतांच्या सूचनेवरून ते त्या खटपटीस लागले. कर्तबगार विठ्ठल सुंदरांनाच त्यांनी आपले सल्लागार नेमले.

विठ्ठल सुंदरांनी अनेक कट व कारस्थाने यशस्वी करून सलाबत जंगाला कैद करविले हैद्राबादच्या गादीवर निजामाला स्थानापन्न केले. विठ्ठलपंतांचा पराक्रम पाहून निजामाने त्यांस आपला दिवाण नेमले. अल्लीचा विठ्ठल सुंदरांवर विश्वास बसण्याचे आणखी एक कारण घडले ते असे. "हैदरजंगाचा खून झाल्यावर तो मारेकरी निजामाकडे गेला आहे अशा भावनेने निजामाला मारण्यासाठी फ्रेंच सैनिक धावले. प्रसंगावधान राखून विठ्ठल सुंदराने तरवारीने तंबूची कनात फाडली. त्यामुळे पडलेल्या भगदाडातून निजामअल्लीला बाहेर काढून घोड्यावर बसविले. त्यांना तडक बऱ्हाणपूरला पळविले. प्राणावर आलेल्या संकटातून विठ्ठल सुंदरांनी त्यांना वाचविले यामुळे निजाम अल्लीची त्यांच्यावर जास्तच मर्जी बसली.

विठ्ठलपंतांचे पेशवाईतील घडामोडीवर बारीक लक्ष असे. त्या वेळी सदाशिवराव भाऊ पेशवाईचा कारभार पहात होते. त्यांनी निजामाकडील इब्राहीमखान गारद्यास आपल्या पदरी नोकरीस ठेविले. सिंदखेडच्या लढाईत

निजामाचा पूर्ण पराभव झाला. भाऊंनी निजामाला खंडणीचा तगादा लावला. यश येत नाही असे पाहून मोहीम केली. उद्‌गीर जवळ लढाई झाली. निजाम घाबरला. त्याने हिंमत सोडली व बोलणी करण्याकरिता वकील पाठविला. भाऊसाहेबांनी निरोप दिला की, "साठ लक्ष रुपये व दौलताबादचा किल्ला देणे."

भाऊसाहेबांची मागणी ऐकून काही रदबदली करण्यासाठी विठ्ठल सुंदर निजामाची शिक्के, कट्यार घेऊन आले. तह ठरला. पण निजामाकडच्या कटकटीस विठ्ठल सुंदरच कारणीभूत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी "विठ्ठल सुंदरांना बडतर्फ करावे" अशी निजामाकड मागणी केली विठ्ठल सुंदरांनी गुदरलेला बाका प्रसंग ओळखून भाऊसाहेबांच्या पुढे नमते घेतले आणि त्यांना कळविले की, "मी सर्व प्रकारे आपल्या पदरचाच आहे; कृपा करावी चाकरी करून दाखवीन. निष्ठेने वर्तणूक करीन"

विठ्ठल सुंदर यांस कामावर कायम ठेविल्याबद्दल भाऊसाहेबांनी १५ लक्ष रु खंडणी वाढविली. निजामाने ती मान्य केली. कारण विठ्ठल सुंदरांनी केलेले उपकार तो विसरला नव्हता. त्याचवेळी सन १७६१ मध्ये पानिपतवर मराठ्यांचा दारुण पराभव झाला सदाशिवराव व विश्वासराव युद्धात मारले गेले आणि त्या धक्क्यामुळे नानासाहेब पेशवे निवर्तले. त्यांच्यानंतर माधवराव पेशवे झाले. त्यामुळे पेशव्यांच्या घरात गृहकलह सुरू झाला. माधवराव व राघोबादादा ह्यांच्यात भांडणे लागली. विठ्ठल सुंदरांनी ही योग्य संधि साधून कारवाईला सुरवात केली. पेशवे दुर्बळ झाल्याची जाणीव निजामाला करून दिली. निजामाने पेशव्यांशी झालेले जुने तह मोडून टाकले दुहीचा फायदा साधून मराठ्यांचे राज्य उलथून पाडण्याचा यांनी प्रयत्न केला ही गोष्ट साधण्यासाठी रामराजास नालायक ठरवून जानोजी भोसल्यांच्या हस्ते मराठेशाहीचा कारभार चालवावा व पेशव्यांना हाकलून द्यावे असा याने बेत केला. देवाजीपंत चोरघडे त्यांच्या मार्फत त्याने जानोजीस फितविले व आपला व्याही गमाजी मुतालीक याच्या मदतीने प्रतिनिधीस फितविले. मोरोबा फडणीस, सदाशिव रामचंद्र शेणवी आणि गोपाळराव पटवर्धन वगैरे

असंतुष्ट सरदारांना त्यांना त्यांच्या पूर्वीच्या जहागिऱ्या देण्याचे आमीष दाखवून पेशव्यांच्या सरदारांना फितविले. हे मराठे सरदार पेशव्यांविरूद्ध निजामाच्या पक्षास मिळाले. पेशव्याविरुद्ध फितूर झाले. त्यांच्या बळावर निजामाने पुण्यावर चाल करून पुणे लुटले, जाळले. ( मे १७६३ ).

नानांच्या ताब्यात लोहगड होता.त्याच्या आधाराला हजारो नागरिक राहिले. पण मोगलांनी सर्व लोकांची लूट केली. नानांना एक वस्त्रानिशी पळून जावे लागले. पुण्यावर हल्ला झाला तेव्हा पेशव्यांची कुटुंबीय मंडळी सिंहगडावर व पुरंदरावर गेली. पुणे लुटले. विठ्ठल सुंदरांनी नाशिक व जुन्नर प्रांत लुटला. फरासखान्यातील सर्व सामान लुटले. कित्येक हवेल्या व पेठा जाळल्या. वाई, भोर, निरा हेही भाग फस्त केले. पर्वतीच्या मूर्ती फोडल्या. सिंहगडाची माची व सरकारी जामदारखाना रघुजी करांड्याने लुटून नेला. विठ्ठल सुंदरांनी तोफखाना घेऊन सासवड जाळले. एक महिना पावेतो लूट जाळपोळ झाली. माधवराव पेशव्यांवर मोठा बिकट प्रसग आला.

पुढे जानोजी प्रबळ झाल्यास त्याला प्रतिस्पर्धी म्हणून विठ्ठल सुंदरांनी कोल्हापूरकरांशीही राजकारण लावून ठेविले, पण त्यामुळे जानोजीस बराच मुलुख द्यावा लागला. माधवराव पेशवे डगमगले नाहीत. त्यांनी आपल्या फौजा निजामाच्या राज्यात घुसवल्या मोगलांचा प्रदेश बेचिराख केला. लुटालूट व जाळपोळ याची परिसीमा केली. हे युद्ध गनिमी काव्याने चालले होते पावसाळा आला म्हणून निजाम विठ्ठल सुंदरसह परत फिरला तसेच माधवरावही परत फिरले. पण त्या अवधीत निजामाकडे गेलेले आपले सरदार परत आपल्याकडे वळविले. पटवर्धन, भोसले, गमाजी, यमाजी हे पावसाळ्याची सबब सांगून परत निजामाकडे फिरकलेच नाहीत. माधवरावांनी त्यांची समजूत घालून त्यांच्या जहागिऱ्या त्यास परत दिल्या.

एकंदर युद्धाचा रंग पाहून निजाम माघारी फिरला. मराठ्यांनी राक्षसभुवनजवळ त्यांना गाठले निजाम स्वत: रात्रीच सर्व सामान टाकून गोदा पार गेला. यात निजामाचे फार नुकसान झाले. गोदेच्या दक्षिण तीरावर विठ्ठल सुंदर होते. त्यांच्याजवळ दहा बारा हजार गारदी व बरेच

मातबर सरदार होते. माधवराव घोड्यावर बसून सनिकांना मार्गदर्शन करीत होते. विठ्ठल सुंदर अंबारीत बसून लढाई चालवीत होते. त्यावेळी माहादाजी शितोळे यांस श्रीमंतांनी आज्ञा केली की, "विठ्ठल सुंदर यांच्या हत्तीवरील माहूत भाल्याने मारावा."

"या कामगिरीबद्दल दहा हजारांचा गाव व बसता हत्ती घेईन." असे तो म्हणताच श्रीमंतांनी ते कबूल केले. माहादाजीने जोरात एक धडक मारून भाल्याने विठ्ठल सुंदरच्या माहुतास भोसकून खाली पाडले. श्रीमंतांनी लगेच कबूल केल्याप्रमाणे त्यास मांजरी गाव इनाम दिला. तसेच बसता हत्तीपण. तेवढ्यात विठ्ठल सुंदरावरही कुणी अज्ञात शिपायाने बंदुकीची गोळी मारली ती त्यांच्या छातीतून आरपार गेली. विठ्ठल सुंदर गतप्राण झाले. ते अंबारीतून खाली कोसळले. दमाजी गायकवाडाकडील अरबांनी त्यांचे मुंडके तोडून भाल्यास टोचून नाचविले पंत वारले. निजाम लढाई हरला. माधवरावांचा जय झाला.

त्याच विठ्ठल सुंदरांच्या अंबारीत बसून पेशवे राक्षसभुवनच्या मुक्कामावर गेले. शेवटी तह होऊन मराठ्यांना ८२ लक्ष रुपयांचा मुलुख मिळाला. त्यानंतर जवळजवळ ३० वर्षे निजामाने डोके वर काढले नाही. विठ्ठलपंतांच्या हुशारीचा उपयोग निजामाने करून घेतला. विठ्ठलपंतांनी आपली शक्ति आणि युक्ति निजामाच्या कारणी लावली. त्यांना 'राजा बहादूर प्रतापवंत' हा किताब असून निजामशाहीत त्यांची जहागीर 'गणेश' या नावाने ओळखली जाते.




नाना फडणवीस

# नाना फडणवीस

## प्रकरण १ ले

रत्नागिरी जिल्ह्यात वेळास नावाचे गाव आहे. तेथे नाना फडणिसांचे पूर्वज महादाजी कृष्ण भानू हे राहात असत. ते त्या गावचे वतनदार असून खाऊन पिऊन सुखी होते महादाजीपंतास चार पुत्र होते महादाजी पंत निवर्तल्यावर त्यांचा थोरला मुलगा विभक्त राहू लागला व बाकीचे त्रिवर्ग बंधू म्हणजे हरि महादेव, रामाजी महादेव आणि बाळाजी महादेव एकत्र राहून आपल्या वतनवाडीवर योगक्षेम करू लागले.

वेळास हा गाव बाणकोट खाडीच्या दक्षिण तीराजवळ आहे, तर श्रीवर्धन हा गाव त्याच खाडीच्या उत्तर तीरास आहे. तेथे बाळाजी विश्वनाथ भट व त्यांचे बंधू जानोजी विश्वनाथ हे राहात होते. त्यांच्याकडे या प्रांताच्या देशमुखीचे वतन होते. या दोन्ही कुटुंबांचा परस्परांवर अतिशय लोभ होता.

खाडीच्या तोंडाशी अंजनवेल व सुवर्णदुर्ग हे किल्ले होते. त्या किल्ल्यांवर आणि आजूबाजूच्या प्रदेशावर हबशी लोकांची सत्ता होती. हबशी व आंग्रे यांची भांडणे होत. त्यात आंग्रे यांना श्रीवर्धनचे भट सामील आहेत असे हबश्यांच्या कानावर आले. तेव्हा त्यांनी बाळाजी विश्वनाथ व त्यांचे बंधू जानोजी विश्वनाथ यास कैद करण्याकरिता माणसे रवाना केली. हे वर्तमान या भट बंधूस समजताच ते जीव बचावण्याकरिता श्रीवर्धनहून पळून गेले.

अशा संकटसमयी भानू बंधूचे काही साहाय्य झाले तर पहावे म्हणून देशमुख वेळासला गेले व तेथे गेल्यावर आपणावर आलेल्या संकटाचे वर्णन

त्यांनी त्रिवर्ग भानू यांस केले. तेव्हा त्यांच्या बरोबर भानू मंडळीपण निघाली. पण वाटेत बाळाजी विश्वनाथ भट यास हबश्यांनी पकडून अंजनवेलीस नेले. त्या वेळी भानूंनी पैसे भरून त्यांची सुटका केली. बाळाजी-पंत अंजनवेलच्या किल्ल्यात वीस पंचवीस दिवस अटकेत होते. भानू या प्रसंगी देशमुखांच्या उपयोगी न पडते तर ते खचित प्राणास मुकले असते. बाळाजीपंतांनी त्या वेळी त्रिवर्ग भानूस वचन दिले की, "आम्हांस भाकर मिळेल तीत तुम्हासही चतकोर मिळेल". हे वचन शेवटच्या बाजारावाच्या कारकीर्दीपर्यंत बाळाजीपंताच्या वंशजांनी पाळून भानूंच्या घराण्यास मोठ्या योग्यतेस चढविले.

बाळाजी विश्वनाथ त्रिवर्ग भानूसह घाट चढून साताऱ्यास आले. व तेथे त्यांनी धनाजी जाधवराव सेनापति याजकडे कारकुनीची नोकरी धरली. पुढे बाळाजींना भाग्यकाल प्राप्त होऊन ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर वैभवास चढले. जानेवारी सन १७१४ त शाहूमहाराजांनी त्यांस पेशवाईची वस्त्रे दिली. त्या प्रसंगी बाळाजी पतांनी महाराजांपाशी विनंती करून राज्याची फडनिशी आपणाकडे मागून घेतली व तिची वस्त्रे हरी महादेव भानू यांस दिली. तेथपासून ज्याप्रमाणे बाळाजीपंत व त्यांचे वंशज हे मराठी राज्याचे पेशवे, त्या प्रमाणेच भानू हे मराठी राज्याचे फडणवीस झाले.

नाना फडणीस यांचा जन्म सातारा येथे दि. १२ फेब्रुवारी १७४२ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव रखमाबाई. या शूर सरदार मेहेंदळे ह्यांची भगिनी होत. नानांचे शिक्षण पेशव्यांच्या मुलांबरोबरच झाले. विश्वासराव, माधवराव आणि नाना ही समवयस्क मुलें, सदाशिवराव भाऊ यांच्या देखरेखी खाली शिकली. त्या वेळचे शिक्षण फारसे गुंतागुंतीचे नव्हते. उत्तम वळणदार अक्षर, झरझर लिहिणे आणि जमाखर्च हिशेब करता येणे यावर भर असे. संध्या, रुद्र, पवमान यांचे पाठांतर करून घेण्यात येई. रामायण व महाभारत आणि जुना इतिहास थोडक्यात सांगितला जाई. घोड्यावर बसणे, तलवार, भाला, बंदूक वगैरे हत्यारांचा उपयोग करण्यात कौशल्य हेच त्या वेळचे सर्वात उच्च शिक्षण होय. जोर, जोडी, कुस्ती, नमस्कार

वगैरे शारीरिक व्यायाम मात्र प्रत्येक मुलाकडून सक्तीने करवून घेण्यात येत असे.

नानांची बुद्धि कुशाग्र आणि प्रगल्भ असून कोणत्याही विषयाचे आकलन त्यांना अत्यंत जलद करता येई. त्यामुळे त्यांनी लिहिणे, वाचणे, हिशेब, जमाखर्च यात चांगले प्रावीण्य मिळविले नानांचा स्वभाव भिडस्त व एकलकोंडा. प्रकृतीच्या अशक्तपणामुळे शारीरिक व्यायामाचा त्यास कंटाळा येई. नानांनी युद्धविद्या शिकण्यात आणि शरीर सामर्थ्य कमावण्यात जी अनास्था दाखविली ती मात्र त्यांना जन्मभर भोवली. त्यांची शारीरिक शिक्षणात मुळीच प्रगति झाली नाही त्यामुळे त्यांना नेहमी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागे. सदाशिवराव भाऊ यांच्या संगतीत राहून दरबारी कामातील उरक, तडफ, रेखीव वर्तन आणि वचक इत्यादि गुण नानांच्या अंगी उतरले. नानांच्या गुणांचा 'प्रभाव त्यांच्या कारभारावर दिसून येतो. नानांचे वडील जनार्दन बल्लाळ यांना पोटशूळाची व्यथा होती. सन १७५६ साली रघुनाथराव दादाबरोबर उत्तर हिंदुस्थानात स्वारीवर गेले असता ते मरण पावले. वडिलांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी नानांस फडणविशीची वस्त्रे व पालखी वगैरे इतमाम दिला (२९ नोव्हेंबर १७५६). नानांना फडनिशी मिळाली त्यावेळी त्यांचे वय होते फक्त चौदा वर्षांचे. या छोट्या फडणिसांवर राज्याचे हिशेब सांभाळण्याची जबाबदारी पडली. फडणिशी मिळाल्यावर नाना सदाशिवराव भाऊबरोबर कर्नाटकात स्वारीवर गेले. हा नानांचा पहिलाच प्रवास होय. पुढे सन १७६० मध्ये अहमदशहा अबदालीचा पेच-प्रसंग उद्भवला.

तो सोडविण्यास सदाशिवराव भाऊ व विश्वासराव उत्तरेस दिल्लीच्या मोहिमेस गेले त्यांच्या बरोबर नानाही गेले. त्यांची पत्नी व मातोश्री याही स्वारीबरोबर होत्या या स्वारीबरोबर जाऊन उत्तर हिंदुस्थानातील क्षेत्रे पाहावी, प्रसिद्ध देवस्थानांचे दर्शन घ्यावे, गंगा, यमुनादि पवित्र नद्यांच्या जलात स्नान करावे असा नानांनी बेत केला. त्यांच्या मातोश्रींची पण तशीच इच्छा होती. नानांनी मथुरा, गोकुळ, वृंदावन ही क्षेत्रे पाहिली. नंतर ते दिल्लीस गेले. मग भाऊसाहेबांच्या छावणीत पोचले. सन १७६१

मध्ये पानिपतवर मराठ्यांचा मोड झाला. फौज उधळली. सैनिकांची कत्तल झाली. लढाईचा डाव उधळताच माणसे जीव वाचविण्यासाठी रणांगणातून पळत सुटली. त्यात नानाही होते. पानिपतच्या रणांगणातून परत येताना त्यांचे फार हाल झाले. त्याचे वर्णन खद्द नानांनी लिहून ठेवले आहे. नाना लिहितात– "श्रीमंत दिसेनासे झाले तेव्हा ईश्वरे बद्धि दिली. माघारे फिरलो, सायंकाळचे दोन घटका दिवसाम घोड्यावर पानिपतात आलो त्या देशाचा मार्ग अगदी ठाऊक नाही तेथे परमेश्वरे वाट दाखवण्यापुरते रामाजीपंत उभे होते. त्यांच्या सांगण्यावरून घोडे व वस्त्रे टाकून दिली शुद्ध लंगोटी लावून बसलो. रात्र जाहल्यावर चालू लागलो तो एक कोस अंतरात तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यानी झाडा घेतला. दर खेपेस समागमेचे दहावीस तोडून टाकीत त्यात मी राहिलो. हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत राहातच गेले. तोच तेच शत्रू येऊन बापूजीपंत, रामाजीपंत वगैरे यास भारी जखमी केले, पडले.

मी एकटा राहिलो तो गवतात गेलो ईश्वरे तृणे करून माझे रक्षण केले. त्यांस मोहिनी घातली. सर्वांस मारिले असता मी जवळ असता न मारिले व गवत लांब असता जाऊ दिले. पुढे ते गेल्यावर जाऊ लागलो. तो पुढे मागती दोन कोसांवर दुसरे दृष्टीस पडले. तेव्हा मागती तृणात जाऊन बसलो. तो जवळ येऊन काढ लागले. ते समयी एक वृद्ध बोलला, "कशास मारता ?" मग गेले. शरीर अशक्त, ऊन पाहिलेच नाही व पादचारी अभ्यास नसता सोळा सतरा कोस अन्न उदका व्यतिरिक्त आलो. क्षुधा तिसरे प्रहरी लागली. तेव्हा बोरीचा पाला सापडला. तो खाऊन पाहिला. तो तोडांत जाईना तसाच सायंकाळी एका गावाबाहेर आलो तो एका बैराग्याने पीठ आणून दिले. त्याची भाकर खाल्ली. ती अमृता प्रमाणे गोड लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकाली गंगासहस्रनाम म्हणत, ईश्वर नाम स्मरण करीत चाललो."

मार्गात एका गावामध्ये एका सावकाराने नानास घरी बोलवून नेऊन आदरातिथ्य केले. काही अंतरावर लष्करापैकी चार पांच दक्षिणी माणसे भेटली. त्या बरोबर सात मजला करून नाना रेवडीत आले. याच मुक्कामी

यास जिगनीस नारोपंत गोखले यांच्या घरी आपली स्त्री खुशाल येऊन पोचल्याचे वर्तमान कळले. नानांची स्त्री यशोदाबाई "रणातून बाहेर निघाल्यावरी तिने घोडी टाकून दिली. ती पाय उतारा होऊन अंगावरील दागिने काढून, फाटके वस्त्र नेसून, अंगास माती लावून दिल्लीच्या रोखे गेली" पुढे तीस सोबत मिळून ती जिगनीस सुखरूप येऊन पोहचली.

नाना जिगनीस नारोपंत गोखले याजकडे गेले. तेथे काही दिवस राहिल्यावर ते बायकोस बरोबर घेऊन दिगेस गेले. तेथे त्यांनी महिनाभर मुक्काम केला. नानांनी चोहीकडे माणसे पाठवून आपल्या आईचा पुष्कळ शोध केला, पण व्यर्थ. दिगेहून ते धोलपुरा वरून ग्वाल्हेरीला आले. तेथून त्यांनी दक्षिणेचा रस्ता धरिला. त्यांनी दामोदरराव हिंगणे दिल्लीस होते त्यांस एक पत्र लिहिले आहे. त्यात ते लिहितात, "तीर्थरूप मातुश्रींची खबर अबदालीचे लष्करात आहे म्हणून लागली आहे. आपण त्यांचे लष्करात जाऊन शोध करावा. आम्ही द्रव्याचे किती संग्रही आहो हे तुम्हास ठाऊकच आहे जर ती शुद्धच असेल तर त्यांचा आग्रह यात्रेस जावयाचा असला तरी त्यास पाठवावी. जर अशुद्धच असेल तर परस्पर गंगेत देह त्याग करण्यासाठी प्रयागला पाठवावी."

नाना सारख्या मातृभक्तास परम दुःख झाले. पुढे दक्षिणेत आल्यावर आपली आई मरण पावल्याची त्यांस खात्रीलायक बातमी कळल्यावर तिच्या उत्तर कार्याकरिता ते टोके येथे गेले. ब्‍र्‍हाणपुरास नाना फडणीस नानासाहेब पेशव्यांना भेटले. पेशव्यांनी लढाईची हकीगत फडणीसांच्या मुखाने ऐकली, मग नाना फडणीस टोक्यास गेले. मागाहून पेशवे पण तेथे आले. त्या नंतरची हकीगत नाना फडणीस लिहितात की, "एक दिवस प्रदोष तेथे पडला. त्या दिवशी राव (बाजीराव) यांचे श्राद्ध म्हणून मला भोजनास बोलाविले. विनंती सांगून पाठविली कीं "प्रदोष आहे." तथापि यावे म्हणूनच उत्तर आले. तेव्हा आज्ञा आली की, रावसाहेबाचे श्राद्ध आहे. याकरिता जरूर जरूर यावे यावरून गेलो."

नंतर श्रीमंत पुण्यास आले व नाना काही दिवस टोक्यास राहिले. तोच परत पुण्यास येताना वाटेतच श्रीमंतांचा काल झाला असे कळले. पुण्याहून निघाल्यापासून चौदा महिन्यांनी नाना पुण्यास परत आले. (जुलै १७६१). नाना त्या वेळी २० वर्षांचेच होते. पूर्व वयातील विपत्तींच्या योगाने त्यांच्या स्वभावावर काहीशी खिन्नतेची छाया पडून राहिली. ती शेवटपर्यंत नष्ट झाली नाही. त्यांच्या वृत्तीमध्ये गांभीर्य उत्पन्न झाले आणि चैनी, लहरी व रंगेल स्वभावाच्या लोकांचा त्यांस तिटकारा येऊ लागला. नुसत्या पानिपतच्या स्वारीपासून नानांना कितीतरी प्रकारचा अनुभव आला.

क्र २००७१ ११/७/८८
विषय नाना

# प्रकरण २ रे

थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत नानांचा राज्यकारभारात प्रवेश झाला. रावसाहेब यास पेशवाईची वस्त्रे मिळाल्यावर ते अल्पवयी असल्यामुळे त्यांच्या राज्याचा कारभार रघुनाथराव व त्यांचे दिवाण सखारामबापू पाहू लागले. परंतु ही गोष्ट पेशव्यांची आई गोपिकाबाई हीस आवडत नसे. त्यातच उरळी कांचनचा राघोबादादाने निजामाशी गुळमुळीत तह करून त्यांस २७ लक्ष रु. चा मुलुख परत देऊन हाती सापडलेल्या निजामाला सोडून दिले. हे कारस्थान शिकविणारा सखारामबापू. सर्व सरदार बापू व दादांच्यावर रागावले तेव्हा दादासाहेब व सखाराम बापू यांनी रागाने राजीनामे दिले व घरी बसले. तेव्हा त्यांचे आर्जव न करता माधवरावांनी त्रिंबकराव मामा, गोपाळराव पटवर्धन, नाना फडणीस, मोरोबा व हरिपंत फडके यांचे कारभारी मंडळ नेमून राज्यकारभार सुरू केला. त्या वेळी पेशवे व त्यांची आई यांच्या पक्षाचा पाडाव करण्याकरिता दादासाहेबांनी मोगलांची मदत मिळविली व घोडनदीच्या लढाईत पेशव्यांचा पराभव करून त्यांस नजर कैदेत ठेविले व त्यांच्या पक्षाचे रास्ते, पटवर्धन वगैरे सरदारांवर सूड उगविला. त्यांची जहागीर जप्त करून त्यांची दाणादाण करून राज्याचा सर्व कारभार पुन्हा आपल्या हाती घेतला. यानंतर दादासाहेबांनी चिंतो विठ्ठल रायरीकर यांस फडणविशी दिली. बाबूराव फडणीस आपला मुलगा मोरोबा यास घेऊन मोगलाईत पळून गेला.

निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याने मराठी सरदारांना आपल्याकडे वळविले त्यामुळे पुण्याचे रक्षण होऊ शकले नाही. पुढे पेशव्यांची व मोगलांची लढाई सुरू झाली. मोगलाने देशी येऊन पुणे जाळून लुटून फस्त केले.

नानांच्या ताब्यात लोहगड किल्ला होता. त्याच्या आश्रयाला हजारो नागरिक राहिले. पण मोगलांनी सर्व लोकांची लूट केली. त्यात नानापण लुटले गेले. त्यांस एक वस्त्रानिशी लोहगडावर पळून जावे लागले. त्या वेळी दादा व सखाराम बापू मोंगलांच्या मुलुखात धुमाकूळ घालीत होते. पुढे मोंगलांशी तह होऊन दादासाहेबांनी माधवराव पेशव्यांच्या हाती पुन्हा राज्यकारभार दिला. ता. ५ आक्टो. १७६३ रोजी नाना व मोरोबा यास फडणविशीची वस्त्रे दिली.

माधवराव पेशव्यांनी १२ वर्षे राज्य केले. तेवढ्या अवधीत त्यांनी दहा लढाया केल्या. मोठमोठाल्या मोहिमात यश मिळवून आपल्या मर्दुमकीचा व मुत्सद्दीपणाचा लौकिक चोहोंकडे गाजविला. शत्रूस जेरीस आणिले आणि पानिपतच्या स्वारीमुळे हीनबळ झालेल्या मराठी राष्ट्रात पुन्हा जोम उत्पन्न केला. नाना फडणीसांवर त्यांचा पूर्ण विश्वास असे. ते दूर परदेशी मुलुख-गिरीस जात तेव्हा किल्ले, कोट, मुलुख, अठरा कारखाने, परराज्यांची नाजुक कारस्थाने हे सर्व नानांच्या हवाली करून जात. पाऊण पाऊण लाख फौज बरोबर घेऊन पेशवे कर्नाटकात जात आणि अवाढव्य प्रमाणावर सैन्याच्या हालचाली, लढाया, वेढे, छापे, वगैरे मसलती स्वत:च्या मेहनतीच्या, मर्दुमकीच्या आणि शहाणपणाच्या बळावर ते तडीस नेत हे खरे आहे. तरी त्यास मिळालेल्या यशाचा काही वाटा नाना फडणीस यांस देणे वाजवी आहे. कारण की एवढ्या मोहिमास लागणारे कोट्यावधि रु. चे द्रव्य राज्यातून दक्षपणाने वसूल करून श्रीमंताकडे फौजेच्या खर्चा-करिता वेळचे वेळी नाना फडणीस पाठवीत होते. दारूगोळा वगैरे सामा-नाचा सुद्धा देशाहून तरतुदीने पुरवठा करीत होते आणि मुख्यत्वे स्वदेशी बंदोबस्त उत्तम रीतीने राखीत होते. म्हणूनच पेशव्यास सर्व मोहिमा निर्वेध पार पाडता आल्या.

अंतर्गत कारभारात नानांचा केवढा दरारा होता याविषयी एक आख्यायिका आहे. श्रीमंत रावसाहेब हैदर अल्लीवर पहिली मोहीम करण्यास गेले तेव्हा त्यांचे वय सुमारे एकोणीस वर्षांचे होते व त्यांचे कुटुंब रमाबाई साहेब यांचे वय पंधरा वर्षांचे होते. त्यांस पुण्यास ठेवून श्रीमंत स्वारीस

निघून गेल्यावर पहिल्याच आठवड्यात बाईंचा कारकून खर्चाची यादी घेऊन रीतीप्रमाणे 'मखलाशी' करून घेण्याकरिता नानांकडे आला. तेव्हा त्यांनी ती पाहून यादीतून विड्यांच्या पानांचे कलम काढून टाकले. कारकुनास आश्चर्य वाटून त्याने तक्रार केली तेव्हा त्यांनी सांगितले की, 'घरी श्रीमंत परत येईपर्यंत बाईसाहेबांस विड्यांच्या पानांचे प्रयोजन नाही. हा खर्च गैरवाजवी, सबब बंद केला आहे.' बाईंना फार राग आला. त्यांनी ती गोष्ट श्रीमंत परत आल्यावर त्यांच्या कानावर घातली परंतु श्रीमतांनी सांगितले की, 'नानांचे म्हणणे वाजवी आहे. या कामी तुमच्या भिडेमुळे सुद्धा मला त्यास दोष देता येत नाही.'

ता. १८ नोव्हेंबर १७७२ रोजी रावसाहेब पेशवे कैलासवासी झाले. त्यांचे धाकटे भाऊ नारायणराव पेशवे झाले. श्रीमंत माधवराव यांनी मरणापूर्वी एकांती श्रीमंत नारायणराव यांस सांगितले होते की, 'जे काय करणे ते हरिपंत यांचे विचारे करीत जा, तर काही दिवस वाचशील नाहीतर तुझ्या जिवास कठीण आहे.' असा् बहुत बोध केला. परंतु श्रीमत फडक्यास काही विचारीत काही न विचारीत, कोणती गोष्ट पोटातही फारशी रहात नसे. यामुळे हरिपंत फारशी लगट करीत नव्हते. नारायणराव पेशवे फार अल्लड होते. तसेच फार हूड होते. कारभारी यांचा बहुमान रक्षीत नसत. एके दिवशी पर्वतीवर बोथाटी फिरविताना त्यांनी गमतीने नानांचे पागोटे उडविले ! भोंवताली हंशा पिकला. पण नाना प्रसंगावधान राखून म्हणाले, "मी कारकूनच आहे. माझे पागोटे पडले यात काही आश्चर्य नाही, "स्वामींनी आपले पागोटे मात्र सभाळावे."

अविचारी लोकांच्या सल्ल्यावरून नारायणरावांनी दादांस पुन्हा प्रतिबंधात घातले. हे कृत्य करू नये म्हणून नाना फडणीस व सखाराम बापू यांनी श्रीमंतास सांगितले. परंतु त्यांनी ऐकले नाही. कैदेतून सुटून जाण्याविषयी दादांनी हैदर अल्लीकडे व नागपुरच्या भोसल्याकडे काही कारस्थान केले. ते कारस्थान उघडकीला आले म्हणून श्रीमंतानी दादासाहेब व आनदीबाई याजवर कैदेची सक्ती अधिक करून त्यांचा छळ केला.

श्रीमंतांच्या स्वभावांतील अजून पोरपणा गेला नव्हता. त्यांनी सखाराम बापूंचा भर दरबारात शिवीगाळ करून उपमर्द केला.

श्रीमंत दादासाहेब व तत्पक्षीय लोक यांनी नारायणरावसाहेब यास कैदेत ठेवण्याचा कट केला. सखारामबापूंची या बेतास गर्भित संमति होती. श्रीमंतास कैद करण्याचीच फक्त मसलत चालली आहे एवढे मात्र नानांस कळले होते व त्याविषयी त्यांनी श्रीमंतास आगाऊ इशारत दिली होती. नारायणरावांच्या वागणुकीचा परिणाम दादासाहेब व तत्पक्षीय मंडळी यांचा फितूर व त्या फितुरीचे पर्यवसान नारायणरावसाहेबांचा खून हे होय. (३० ऑगस्ट १७७३). मरणसमयी माधवरावांनी राघोबा व सखाराम बापू यांचे हाती नारायणाचे संरक्षण करा व राज्य सभाळा म्हणून नारायणाचा हात दिला होता पण प्रत्यक्षात त्याचा मृत्यू झाला. तेव्हा सखाराम बापूस फारच दुःख झाले. नारायणरावाचा वध झाला ही गोष्ट नानांसही लागून राहिली. पेशव्यास फक्त धरून कैदेत ठेऊन दादांनी कारभार पहावा असाच मूळ कट होता. मारण्याचा बेत हा अगदी आयत्या वेळी ठरला. तो आनंदीबाई व तिचे लोक यांनी केला. अर्थात नानांस तो कट अजिबात माहीत नव्हता. या कामी नानांवर कोणताही आरोप येऊ शकत नाही.

त्या वेळी भेदभाव विसरून पेशव्यांचे सर्व सरदार एक झाले. कारण ते सर्व राघोबावर चिडले होते. काही झाले तरी पेशवाई राघोबास पचू द्यावयाची नाही असे त्यांनी ठरविले. या मसलतीत मुख्य बारा माणसे होती, म्हणून त्यांच्या मसलतीस बारभाईचे कारस्थान म्हणतात सखाराम बापूस बाह्यत: वडीलकी देऊन नानांनीच हे कारस्थान पार पाडले. नारायणरावाचा खून झाला तेव्हा त्याची बायको गंगाबाई दीड महिन्याची गरोदर होती तिला मारून टाकावे निदान तिचा गर्भपात तरी करावा याबद्दल आनंदीबाईने आटोकाट प्रयत्न केले पण या प्रयत्नांना यश न येता तिचा गर्भ दिवसेदिवस वाढू लागला. तेव्हा या गुप्त कारस्थानाला जास्तच जोर आला दादांना अधिकारभ्रष्ट करून तूर्त गंगाबाईच्या नावाने कारभार चालवावा. पुढे तिला सुदैवाने मुलगा झाला तर ठीकच, तसे न होईल

तर तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नावाने पेशवाई चालवावी. बापूंनी मुख्य आणि नानांनी दुय्यम कारभारी या नात्याने कामे करावी अशी बारभाईची मसलत पक्की झाली आणि त्यांना अनुकूल अशी संधीही लवकर प्राप्त झाली. बारभाईंनी गंगाबाईस पुरंदरावर बंदोबस्तात ठेविले बरोबर पार्वतीबाई व सगुणाबाई होत्या. पुरुषोत्तम दाजी पटवर्धन यांचेकडे गडाच्या बंदोबस्ताचे काम सोपविले होते.

नारायणरावांच्या खुनाचे निमित्त करून निजाम पुण्याकडे येऊ लागला. तेव्हां दादासाहेब त्यांच्यावर निघाले. बरोबर बापू व नाना हे होते. परंतु आजारीपणाच्या सबबी सांगून ते पुण्यास परत आले. त्यांनी गंगाबाईस पुरंदरावर ठेवून, दादांच्या पक्षातील लोकांना पकडून गंगाबाईच्या नावे द्वाही फिरविली व स्वत: कारभारी बनले. दादांस बंडखोर ठरवून हरिपंताने साताऱ्यास जाऊन छत्रपतींकडून राघोबास पदच्युत करून पेशवाईची वस्त्रे गंगाबाईच्या नावे व कारभाऱ्यांची बापू व नानांच्या नावे घेतली फेब्रुवारी २७ रोजी छत्रपतींचे आज्ञापत्र निघाले.

पुरंदरावर ता. १८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाई प्रसूत होऊन सवाईरावसाहेब जन्मास आले. (याप्रमाणे पेशव्यांच्या गादीला योग्य वारस उत्पन्न झाल्यामुळे दादांच्या धामधुमीला आता निव्वळ बंडाचे स्वरूप प्राप्त झाले ) तो ४० दिवसांचा होताच कारभाऱ्यांनी त्याच्या नावाने पेशवाईची वस्त्रे आणिली. तेव्हापासून सवाई माधवरावाची कारकीर्द समजतात.

दादास बंडखोर ठरवून बारभाईंनी भोसले व निजाम यांना आपल्या पक्षास वळविले व खुद्द दादांच्या सैन्यातच फितुरी केली. ही हकीगत समजताच दादा पुण्याकडे वळले. कारभाऱ्यांनी त्रिंबकराव पेठे यास त्यांच्या तोंडावर पाठविले. मामांनी उतावीळ केल्याने त्यांचा पराभव होऊन त्यात ते मारले गेले. त्यावर हरिपंत फडक्यास पाठविले. त्याने भोसले व निजाम यांच्यासह दादांचा पाठलाग केला तेव्हा दादा इंदूरकडे पळाले. तेथे शिंदे व होळकर यांनी त्यांना मदत केली. शिंदे यांनी दुटप्पीपणाचे राष्ट्रघातकी धोरण स्वीकारले ! यात त्यांचा आपमतलबीपणा होता. प्रत्येक वेळी शिंदे

यांनी मध्यस्थी करताना स्वार्थ साधला. नानांची या वेळी स्थिति फार बिकट झाली होती. बारभाईत आपसात दुही, राज्यात सर्वत्र फितुरी, कोणावर विश्वास ठेवावा हे समजण्याची पचाईत, पैशाची टंचाई, प्रजा उदासीन, भोसले व निजाम स्वार्थसाधू, असा एकदर प्रसंग बनला होता.

मध्यंतरी बारभाईतले मोरोबादादा फडणीस यांनी नानांना काढून लावण्यासाठी कारस्थान केले. पुरदरची हवा पावसाळयात अतिशय गार असल्यामुळे हे चौघेही ( बापू, नाना, गंगाबाई व सवाईमाधवराव ) खाली सासवडास रहावयास आले होते. (सप्टेंबर १७७४ ) एके दिवशी या चौघाना एकदम कैद करण्याचा मोरोबाने व्यूह रचिला. परंतु या बेताचा सुगावा कारभाऱ्यास आगाऊ थोडा वेळ लागल्यामुळे ते गंगाबाई व नूतन पेशवे यांस बरोबर घेऊन रातोरात पडत्या पावसात किल्ल्यावर पळून गेले. याप्रमाणे ही मसलत फसली. तरी मोरोबाने पुन्हा प्रयत्न केला. पुरंदर किल्ल्याच्या माचीस सिद्दी लोकांचे पहारे होते. या सिद्दी लोकांस वश करून घेऊन त्यांच्यामार्फत गडकऱ्यांशी बोलणे लावले की, "तूर्त तुम्हास १५ हजार रु. देतो. तुम्ही उभयता कारभारी, गंगाबाई व तिचा मुलगा यांस कैद करावे. तसे केलेत म्हणजे आणखी दोन लक्ष रु. देईन." गडकऱ्यांनी हे बोलणे कारभाऱ्यांच्या कानावर घातले, तेव्हा त्यांनी तत्काळ त्या सिद्दी लोकांची डोकी मारविली. परंतु दस्तऐवजी पुरावा न सापडल्यामुळे त्यांना मोरोबाचे पारिपत्य करता आले नाही.

माधवरावांचे कारकीर्दीत शिंदे व होळकर कसे साळसूदपणे वर्तत होते. निजाम हैदर यासारख्या परकी राजांना त्या वेळी मराठी राज्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छातीच होत नव्हती. उलट मराठ्यांची स्वारी आपणावर झाली तर आपली कशी दशा होईल याच काळजीत ते चूर होऊन गेलेले असत. त्या वेळचे राज्ययंत्र असे खंबीर होते, परंतु ती स्थिति आता पार पालटून गेली होती. कोणीही एखाद्या उपटसुंभाने चार सोट भैरव हाताशी धरून रयतेला खुशाल लुटावे किंवा मारावे. या अनर्थाला महादजी शिंदेच कारणीभूत झाले होते. अशा बिकटप्रसंगी नानांनी जी

मसलत योजिली तिजवरून त्यांच्या राजकीय धोरणाचे गूढ रहस्य उमजू लागते. शिंदे हे कर्ते व शूर सरदार खरे, पण ते डोईजड होऊन आतापर्यंत राज्यनाशास कारण झाले आहेत. ते होळकरांच्या मदतीमुळेच झाले याकरिता ही डोईजड झालेली शिंदे-होळकरांची जोडी फोडून त्या दोघा सरदारात किंचित तेढ उत्पन्न करावी व दोघांपैकी कोणातरी एकास नेहमी लगामी लावून ठेवावे. त्याप्रमाणे मसलत योजून तिच्याच अनुरोधाने नाना आमरण वागत आले. त्यांनी महादजी शिंद्यास पूर्णपणे अनुकूल करून घेतले.

पावसाळा संपल्यावर दादा, हे शिंदे होळकरांच्या फोजेसह नर्मदाकाठी उतरले तेव्हा समेट झाल्यास पहावा म्हणून नाना व बापू हे तापीकाठी त्यांना जाऊन भेटले. परंतु दादांची समजूत पटेना. तेव्हा कारभाऱ्यांनी शिंदे होळकरास फोडून हरिपंतासह त्यांना दादावर पाठविले. दादा गुजराथेत पळाले. तेथे त्यांना गोविंदराव गायकवाड मिळाला. तरीही हरिपंताने महीवर दादांचा पराभव केला. तेव्हा दादा खंबायतेहून सुरतेस इंग्रजाकडे गेले. इग्रजांनी गृहकलहाचा फायदा घेऊन साष्टी काबीज केली. परंतु ती पचावी कशी या भीतीने इंग्रज चूर असता, दादांनी आयतीच त्यांच्याकडे मदत मागितली. तीन हजार फौज मदतीस आल्यास साष्टी व शिवाय वसई वगैरे सव्वा एकोणीस लाखांचा प्रांत इंग्रजास बहाल करण्यास दादा तयार झाले. मग इंग्रजांची फौज घेऊन दादा खंबायतच्या खाली उतरले. पण या वेळी त्यांच्या व हरिपंताच्या किरकोळ लढाया झाल्या. (१७७६) याच वेळी हैदर व कोल्हापूरकर हे पेशवाईवर उठले होते. राज्यात अंदाधुंदी माजली होती. पैशाने हलाखी आली होती व चोवीस लाखांचा प्रांत इंग्रजांनी काबीज केला होता. तेव्हा या एकंदर नुकसानीपेक्षा साष्टी व भडोच वगैरे सहा लक्षांचा मुलूख इंग्रजांस देऊन आणि मुख्यत: घरभेद्या दादांस हाती घेण्याचे ठरवून नानांनी त्याप्रमाणे पुरंदरचा तह केला. (१७७६) मग नानांनी हरिपंतास हैदराची बंडाळी मोडण्यास व कोल्हापुरचा दंगा नाहीसा करण्यास महादजी शिंद्यास पाठविले. त्यांनी सोपविलेली कामगिरी बरोबर बजावली



२००७ ११/४/०८
विषय

याचवेळी मोरोबाने आणखी एक मोठे कारस्थान रचिले. त्यात दादांच्या पक्षाची एकूण एक मंडळी होती. इतकेच नव्हे तर बारभाईतील एकट्या नानाखेरीज करून सर्व मंडळी त्यात सामील झाली होती. (प्रत्यक्ष बापू सुद्धा). हा नानांवर कठीण प्रसंग होता. इंग्रजांच्या बळावर प्रतिस्पर्धी प्रबल झाले होते. जिवलग मित्रही उलटले होते, जवळ फौज व पैका नव्हता, अशी चहूकडून अडचण आली होती तथापि त्याने आपल्या विलक्षण बुद्धिसामर्थ्याने हे कारस्थान हाणून पाडले. त्यांना एके दिवशी रात्री पकडायचे ठरले होते व रात्री १२ च्या घटकेस पुण्यास जी तोफ उडत असे ती पकडण्याची वेळ ठरवली होती. वेळेच्या आधी बापू हे नानांकडे बराच वेळ येऊन बसले होते. नानांनी पुण्याच्या तोफेच्या गोलंदाजास आधीच सांगून ठेविले, 'पुरंदरच्या ५ तोफा झाल्यावर आज तोफ उडवा !' बापू गेल्यावर तावडतोब नाना एकटे निघून पुरंदरी पोहोचले. त्यांच्या आश्रितासुद्धा ही बातमी समजली नाही. पुरंदरच्या तोफा झाल्या व मग पुण्याची तोफ झाली. कटवाल्यांच्या ५०० स्वारांनी नानांच्या वाड्यास घेरा घातला. पण नाना सापडले नाहीत. पुढे मोरोबाने पार्वतीबाईकडून स्वत:स कारभाऱ्याची वस्त्रे घेतली. पुण्याच्या इंग्रज वकिलाने ही बातमी मुंबईस कळविली व दादास सत्वर मदत करण्यास कळविले. शेवटी शिद्यांच्या फौजेने एकदम पुण्यास येऊन मोरोबास पकडून नानांच्या स्वाधीन केले. मग सर्व कटवाल्यांना शिक्षा झाल्या बापूस मात्र नजरकैद झाली व नाना पुन्हा कारभारी झाले (११ जुलै १७७८). तळेगाव, वडगाव येथे इंग्रजांचा पराभव झाला. याच वेळी फितुरीचे अस्सल कागद सापडल्यावरून बापूस कैद करण्यात आले. यापुढे मरेपर्यंत बापू कैदेतच होते शेवटी शिद्यांच्यामार्फत सालबाई येथे तह होऊन साष्टी-खेरीज मराठ्यांचा घेतलेला सर्व मुलूख आणि दादासाहेबांस, इंग्रजांनी मराठ्याच्या हाती दिले. (१७८२) सहा वर्षे चाललेले युद्ध बंद झाले. राघोबादादा पुढे कोपरगावी राहू लागले. त्यांना महिना २५,००० रु. तनखा होता. हेच ते बारभाईचे कारस्थान. यातच मोरोबाचे कारस्थान नानांनी मोडून काढले. मध्येच पानिपतावर बेपत्ता झालेला सदाशिवराव भाऊ यांचा तोतया निर्माण झाला. त्याने कोकणात अनेकांना वश करून

मोठी धामधूम माजविली. पार्वतीबाईंनाही तोतया खराच सदाशिवराव भाऊ असावा असे वाटू लागले. नानांनी न डगमगता तोतयाला पकडले. जाणत्या लोकांकडून खात्री करून घेऊन त्याचा जबाब घेतला. 'आपण खरे सदाशिवराव भाऊ नाही' हे त्याने कबूल केले. मग नानांनी तोतयाला 'डोक्यात मेखसू' मारून ठार करण्याची शिक्षा दिली. त्याला सामील होऊन दंगल माजविणाऱ्यांनाही कडक शासन केले. हे सर्व तोतयाचे प्रकरण पार पाडताना नानांची कसोटीच पणाला लागली.

# प्रकरण ३ रे

सवाई माधवराव हे सव्वातीन वर्षांचे झाल्यावर मातुश्री गंगाबाई ह्या नवज्वराने वारल्या. (१३ जुलै १७७७) सवाई रावसाहेबांस लहानपणी नाना फार जपत असत. सवाई माधवराव लहान असतानाच त्याला मारण्याकरिता आनंदीबाईने अनेक खटपटी केल्या परंतु नाना फडणिसांनी डोळ्यांत तेल घालून त्याचे रक्षण केले. आनंदीबाईचे सर्व प्रयत्न फसले. सवाई माधवराव पाच वर्षांचे झाल्यावर त्यांना घेऊन नाना पुण्यास आले. पुढे नानांनी त्यांच्या योग्यतेला साजेल असे उत्तम शिक्षण दिले. खास शिक्षक नेमून शिक्षणाची व्यवस्था केली. 'नारायण व्यवहार शिक्षा' हा ग्रंथ आणि पेशवाई बखर, ही बखर नानानी मुद्दाम तयार करून घेतली. त्यांचे पहिले लग्न केले. (१०–२–१७८२) लग्नात व्यवस्था इतकी उत्तम ठेवली होती की प्रत्येक कामाची यादी करून त्यावर माणसे नेमली होती. पेशवे थोडेसे मोठे झाल्यावर नाना त्यास दररोज चार घटका दरबारात घेऊन बसत.

सालवाईच्या तहानंतर नानांचा कारभार मोठ्या डौलाचा झाला. सर्वत्र समतोल राखण्याच्या कामी नानांनी अपूर्व यश मिळविले. सालवाईचा तह झाल्याने महादजींचा उत्तरेकडील उद्योग निर्वेध सुरू झाला. इंग्रजावर मात करून दिल्लीची बादशाही महादजीने पूर्ण ताब्यात घेतली. बादशहाला महिना ६५ हजार रु. तनखा घेणारा करून वकील मुतलकीच्या आणि मीर बक्षी गिरीच्या सनदा घेतल्या. (८–१२–१७८४) बादशाहीत हा मान पूर्वी एकदा फक्त निजामुलमुकला लाभला होता. याच सनदा पुढे संगमावर मोठा दरबार भरून तोफांच्या सलामीत पेशव्यांना अर्पण केल्या. (२२–६–१७९२) अशा प्रकारे दिल्लीच्या राजकारणात मराठ्यांना अपूर्व यश मिळाल्यावर

दक्षिणेत खडर्याची लढाई झाली आणि पूर्वी कधी मिळाला नव्हता एवढा मराठ्यांना निजामावर जय मिळाला. (सन १७९५ मार्च) मराठ्यांच्या सत्तेला लाभलेला हा परमोच्च बिंदु होय. सन १७७४ पासून वीस बावीस वर्षे नाना फडणीस यांनी पेशवाईचा कारभार चालविला. आपल्या अकलेच्या जोरावर सर्व संकटांचे निरसन करून पेशवाई राज्य नानांनी आजपर्यंत निभावले. इतकेच नाही तर ते राज्य ऊर्जितावस्थेला आणले. नारायणराव पेशव्यांच्या आमदानीत जेवढा मुलुख होता तितकाच मुलुख सवाई माधव-रावांच्या ताब्यात होता. त्या वेळी सर्व सरदार पेशव्यांचे आज्ञा अनुसारी होते. त्याप्रमाणे याही वेळेस झाले होते. इंग्रज, टिपू, वगैरे परकीय सरकारशी तहनामे होऊन परस्परांच्या राजकीय वर्तनाच्या मर्यादा ठरून गेल्या होत्या. हे सर्व नाना फडणीस यांनी घडवून आणले. त्यांच्या कर्तृत्वाची कीर्ति महाराष्ट्राच्या इतिहासात खरोखरच चिरस्थायी होण्याच्याच योग्यतेची आहे ही खात्री होते.

खडर्याच्या लढाईनंतर पुढे नानांच्या नशिबाने उलट खाल्ली. मराठी राज्याचे ग्रह फिरले. महादजी शिंदे व हरिपंत फडके हे नानांचे डावे उजवे हात आणि मराठेशाहीचे आधारस्तंभ कालाच्या तडाख्यात सापडले. सवाई माधवरावांच्या आत्महत्येमुळे मराठेशाहीवर मृत्युयोग ओढवला. (स १७९५) सवाई माधवरावाच्या मृत्यूमुळे, ज्या श्रीमंतांच्या नावावर नानांनी आज-पर्यंत मोठमोठे व्यूह रचले व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर ते पार पाडले, त्या मनोरथाचा डोलारा एकदम कोसळून जमीनदोस्त झाला. आजपर्यंतचे त्यांचे सर्व श्रम मातीमोलाचे ठरले आणि सुकाणू मोडलेल्या गलबता-प्रमाणे ते स्वत: भवितव्यतेच्या तरंगावर विनाधार हेलकावे खाऊ लागले. राष्ट्रसंवर्धनाला आवश्यक असणाऱ्या सर्व सद्‌गुणांचा एकाएकी नाश होऊन रावबाजीच्या राज्यनाशाच्या नवीन मन्वंतरास सुरुवात झाली. पुन्हा पहिल्या पासून आरंभ करण्याची वेळ आली.

बाजीराव रघुनाथशी असलेला विरुद्धसंबंध लक्षात घेऊन यांनी त्याचा धाकटा भाऊ चिमाजी यास यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन आपण कारभार करण्याचे ठरविले. पण शिंद्याच्या मदतीने रावबाजींने

पेशवाई मिळविण्याचा प्रयत्न केला. बाळोबा पागनीस हा शिंद्यांचा प्रमुख कारभारी होता. त्याने परशुराम भाऊ पटवर्धन या नानांच्या एका विश्वासातील सेनापतीसच नानांच्या विरुद्ध उभे केले. तेव्हा नाना साताऱ्यास गेले आणि तेथून वाई व पुढे महाडकडे रवाना झाले. (२१ मार्च १७९६) इकडे रावबाजी आपल्या ताब्यात राहणार नाही असे वाटल्यावरून त्याला अटक करून भाऊच्या नेतृत्वाखाली चिमाजीला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाईचा कारभार सुरू झाला. परशुरामभाऊ महाडाकडेही नानास पकडण्याकरिता जाता, पण पावसाळ्यामुळ त्याचा निरुपाय झाला. पण तेवढ्या अवधीत नानांनी स्वकीयांचे साहाय्य व परकीयांची मदत घेण्याची खटपट सुरू केली. शिंद्यापैकी एक पक्ष नानांस सामील झाला. आणि दोन कोट रु., व सव्वास लक्षांची जहागीर कबूल करून नानांनी शिंद्यांना फोडले. खर्ड्याच्या लढाईतील यश मातीमोल करुन निजामाला आपल्या ताब्यात घेतले आणि इग्रजांनाही नानांनी वळवले होतेच. अशा पद्धतीने पैशाच्या व बुद्धीच्या जोरावर नानांनी महाडचे शेवटचे कारस्थान उभारले. त्यात त्यांची तारतम्य बुद्धि, दूरदृष्टि, मनुष्य स्वभावाची पारख, आपले हेतू सिद्धीस नेण्याकरिता याजलेल्या साधनांचे औचित्य व वैपुल्य, महाराष्ट्रात त्याच्या नावाचा दरारा व वचक या सर्व गोष्टी व्यक्त होतात. नानांची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून सर्व लोक चकित होऊन गेले. त्या वेळी हिंदुस्तानातील असलेले युरापियन लोक त्यास 'मराठा मॅकियाव्हेली' असे म्हणू लागले.

दौलतराव शिंद्यांकडून नूतन पेशवा चिमाजी आणि बाळोबा पागनीस यांस कैद करून बाजीराव रघुनाथाला पेशवा केले- आणि आपण पुन्हा कारभारी झाले. (स. १७९६ डिसें) पण पैसा हातात येत नाही असे पाहून वानवडीस मेजवानास बोलावून दौलतरावाने नानास विश्वासघाताने कैद केले. (स. १७९७ डिसें.) पुढे त्यांना नगरच्या किल्ल्यात पाठविले. मग दोन कोट रु. घेऊन त्यांना मुक्त केले. (सन १७९८ जुलै १८)

पण या सर्व ध्येयशून्य स्वार्थी कारवायांचा परिणाम दोन वर्षात वसईच्या तहाने मराठ्यांचे स्वातंत्र्य नष्ट होण्यात झाला.

# प्रकरण ४ थे

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर माजलेल्या अराजकात नानांचे फार हाल झाले. त्यांना बंदीवासही भोगावा लागला. शेवटी रावबाजीस शरण आणले. एक दिवशी रात्री बारा वाजता रावबाजी वेष पालटून नानांच्याकडे गेले. नानांच्या पायावर डोके ठेवून, 'आपण माझे व मराठी राज्याचे रक्षण करावे आपणच राज्याचा पुन्हा कारभार पहावा' असे म्हणून रावबाजी अश्रू ढाळू लागले. त्याबरोबर नानांनाही दया आली. त्यांनी कारभारीपद स्वीकारले. पण पुन्हा ते शनिवार वाड्यात गेले नाहीत. आपला मित्र चक्रदेव यास मध्यस्थ नेमले होते. त्याच्या वतीने ते कारभार पहात असत.

नगरच्या किल्ल्यातून सुटून आल्यावर नानांची तब्येत ढासळू लागली. त्यांचे देहावसान (१३ मार्च १८००) गुरुवारी मध्यरात्री झाले जणू पुढे येणाऱ्या भयंकर संकटातून परमेश्वरानेच त्यांची सुटका केली त्या वेळी पेशवे आले होते अरबांनी आपल्या पगाराचा फडशा करून घेतल्यावर मग नानांचे शव बाहेर काढू दिले. " नदीवर दहा सहस्र माणूस मिळाले होते. नानांकरिता शहरात ते दिवशी हाहाकार झाला." याप्रमाणे या थोर पुरुषाचा शेवट झाला. नाना वारले व मराठी साम्राज्य नष्ट झाले या वाक्यातच त्यांचे कर्तृत्व दिसून येते.

रावबाजीने नानांचे वाडे, जहागीर व इनामी गावे जप्त करून त्यांच्या पत्नीस शनवार वाड्यात आणून ठेविले नानांजवळील अफाट संपत्ती हाती येण्यासाठी तिला वाड्यात आणिले. नानांचा दत्तक, दत्तक पुत्र धुडकावून त्यांचा पक्का सूड उगवला. यानंतर नानांच्या पक्षाच्या सर्व मंडळीस पेशव्यांनी

प्रतिबंधात ठेविले. यशवंतराव होळकराने पुणे जाळले तेव्हा रावबाजी पळून गेले होते. जिऊबाई नानांची पत्नी वाड्यातच होती. यशवंतरावाने बाईस लोहगड किल्ल्यावर नानाचा विश्वासू नोकर धोंडोपंत नित्सुरे यांच्या स्वाधीन केले. नानांचा मुख्य खजिना येथेच असे. पुढे दोन वर्षांनी जनरल वेलस्लीने मध्यस्थी करून बाईस दरसाल बारा हजारांची नेमणूक करून देऊन पेशव्यांच्या आग्रहावरून बाईस लोहगड किल्ला सोडावयास लावला. नंतर बाई इंग्रजांच्या आसऱ्याने पनवेलीस पेशवाई नष्ट होईपर्यंत राहिली. पेशव्यांनी तिला आपल्या ताब्यात आणण्याची खूप खटपट केली पण ती त्यांच्याकडे आली नाही.

ज्या इंग्रजांशी नानांनी आमरण वैर चालविले, त्यापैकी एक (कर्नल पामर) म्हणतो की, " नाना गेले व त्याबरोबरच मराठी राज्यातील शहाण– पणा व नेमस्तपणाही लयास गेली. "

लॉर्ड वेलस्लीने पेशव्यांना पाठविलेल्या दुखवटयाच्या पत्रात लिहिले की, "बाळाजी पंडित हे बुद्धिमत्तेने, कर्तृत्वाने आणि थोर सद्‌गुणांनी ख्याति पावले होते, अशांचे मरण सर्वदा दुःखास कारण होते. त्यांच्या वागणुकीचे नियम सचोटीचे असून त्यांचे हेतू प्रशंसनीय होते. ते आपल्या धन्याच्या राज्याचे कल्याण व उत्कर्ष होण्यासाठी सतत झटले."

शत्रूंनी ज्यांची अशी स्तुति गायिली, त्यांना त्यांच्या लोकांनी "खूप शर्तीने राज्य राखिले यशवंत फडणिस नाना" असे म्हटल्यास नवल नाही.

नानांचा बांधा उभार असून सडपातळ होता. वर्ण किंचित काळसर असून मुद्रा गंभीर होती. त्यांचे डोळे पाणीदार, तीक्ष्ण व चंचल होते. त्याजकडे पाहता कोणालाही त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती वाटत असे. त्यांचे शरीर मजबूत नव्हते. त्यामुळे स्वारी शिकारी करण्याचा मात्र त्यास कंटाळा येत असे. त्यांचे शरीर कमकुवत होते, तरी त्यांचे आहारविहारादी व्यापार अति नियमित असल्यामुळे त्यांची प्रकृति निकोप असे. त्यांचे वडील जनार्दन बल्लाळ यांस पोटशुळाची व्यथा होती. ती नानांसही उतारवयात जडली होती.

नानांची दिनचर्या पुढे दिल्याप्रमाणे होती. ते नेहमी अरुणोदयाबरोबर उठत. मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर थोडा वेळ देवाचे नामस्मरण करून नंतर काही वेळ जरूरीची कामे पहात. नंतर स्नान, संध्या, पूजा वगैरे नित्य-कृत्यांत दोन तास घालवीत. याच वेळी कोणी विद्वान्, शास्त्री, पंडित वगैरे नवीन आले असतील त्यांच्या तारतम्याने भेटी होत व त्यांची योग्य संभावना होई तों प्रहर दिवस वर येई. नंतर ते पालखीत बसून देवदर्शना करिता बेलबागेत जात.

तेथे गेल्यावर हातपाय धुवून सोवळे नेसणे होईपर्यंत शहरचे रोजचे वर्दीवाले यांनी येऊन बाजार जिनसांचे निरख वाचून दाखवावे व शहरात काही कमीजास्त झालेली गोष्ट कळवावी. नंतर सुमारे घटकाभर पंचो-पचारयुक्त पूजा करून सवडीप्रमाणे विष्णुसहस्रनामाचा पाठ म्हणत. नंतर ते आपल्या वाड्यात परत जाऊन बाराव्या घटकेच्या अमलात भोजन करीत. भोजनोत्तर घटकाभर विश्रांति घेण्याचा त्यांचा परिपाठ असे. नंतर ते कारभारास बसत. ते सायंकाळचा घटका दिवस राहीतो जाग्यावरून हालत नसत. सरकारी काम आटोपल्यावर दोन घटका विश्रांति घेत किंवा बाहेर देवदर्शनास जात किंवा सरकार दरबार भरावयाचा असल्यास तिकडे जात. त्यांच्या भरंवशाची काही मुत्सद्दी मंडळी होती व त्यापैकी निरनिराळया आसामीकडे निरनिराळी कामे वाटून दिली होती. त्यांची वर्दी घेणे विचारपूस करून त्यांस दुसरी कामे सांगणे. यानंतर दोन घटका सायंसंध्या, काही नियमित स्तोत्रपाठ व उपाहार होत असे. यानंतर प्रहररात्रीपासून मध्यरात्र होईपर्यंत गुप्तहेरांनी आणलेल्या बातम्या ऐकणे, पत्रांची उत्तरे लिहिणे, कारभारी मंडळींशी खलबते करणे ही कामे होत. यानंतर दीड प्रहर काय तो निद्रा घेण्यात जात असे. याप्रमाणे त्यांच्या सर्व वेळा बांधलेल्या असल्यामुळे त्यांच्या हातून इतका उद्योग होत असे की, तो सांगू लागल्यास कोणास खरा देखील वाटणार नाही.

नानांनी शिव व विष्णू या देवांचीच देवळे बांधली आहेत. यावरून त्यांची भक्ति हरि–हरांवर विशेष होती असे दिसते. नानांच्या वर्तनात आस्तिक्यबुद्धि पुष्कळ होती. परंतु त्यांच्या ठायी धर्मभोळेपणा मात्र बिल–

कुल नव्हता. ते चतुर्थी, एकादशी, प्रदोष ही उपोषणे करीत असत. त्यांचा फलज्योतिषावर बराच विश्वास होता. ते आपल्या आप्तइष्टजनांस ममतेने वागवीत असत. तथापि आप्तांपैकी कोणास त्यांनी आपल्याजवळ बाळगून ठेविले नाही.

नानांना भोजनास तिखट पदार्थ बिलकूल खपत नसत. त्यांना स्वत:चे पागोटे बांधता येत नव्हते, नाना कदाचित् चहा पीत असतील. त्यांना तंबाखू खाण्याचे आणि तपकीर ओढण्याचे व्यसन होते अशी खात्रीदायक माहिती मिळते. नाना पराकाष्ठेचे उद्योगी, अतिशय नियमित, व सचोटीने वागणारे गृहस्थ होते. त्यांच्या तोंडातून एकदा शब्द गेला आणि तो पुढे खोटा ठरला. असे कधीच झाले नाही. त्यांची धर्मावर कडक निष्ठा होती. स्वामिभक्ति व स्वदेशाभिमान या दोन गोष्टी त्यांजमध्ये पूर्ण वसत होत्या. त्यांचा स्वभाव दयाळू होता व ते परोपकाराविषयी तत्पर होते. नानांच्या हातून ज्या ज्या परोपकाराच्या गोष्टी झाल्या आहेत त्या साऱ्या पेशवाईत कोणाच्याही हातून झालेल्या नाहीत.

आपल्या अंगात कितीही अक्कल असली तरी आयत्या वेळी संकटात हात देणारा पैशाशिवाय दुसरा मित्र नाही हे नाना पूर्णपणे जाणून होते. त्यांनी मोठ्या आस्थेने द्रव्यसंचय केला होता. त्यांच्या श्रीमंतीवरून लोक त्यांना नवकोट नारायण म्हणत. हिंदुस्थानच्या बहुतेक भागात विश्वासू सावकारांच्या हाती गुप्तपणे ठेवी ठेवल्या होत्या. त्या अशाकरिता की, कोणत्याही वेळी पाहिजे तेथे आपणास जरूर लागल्यास त्या आपणास मिळाव्या. फडणिशीचे उत्पन्न पाच लाख रु. होते. नानांचा खर्चही अवाढव्य प्रमाणावर होता. त्यांचा दानधर्मही फार मोठा होता खर्चवेच वजा जाता सवाई माधवरावांच्या मरणाच्या वेळी तीन चार कोट रु शिल्लक होते पुढे बाजीरावाच्या सुरवातीनंतर सर्वत्र अंधाधुंदी माजून राहिली. ती मोडून राज्य रक्षण करावे या हेतूने नानांनी जी जी राजकारणे केली ती ती सर्व बाजीराव, दौलतराव व सर्जेराव या त्रिकुटाच्या दुष्टपणाने त्यांच्या अंगावर उलटली आणि त्यांचे सर्व द्रव्य मात्र मधल्यामध्येच नष्ट झाले.

कोट्यवधीची दौलत संभाळणारे व कोट्यवधीची शिल्लक बाळगणारे नाना फडणीस अखेर दुष्टांच्या तावडीत सापडून कफल्लक स्थितीतच मरण पावले.

त्यांनी मौजे नऱ्हे-आंबेगांव येथून पक्का चुनेगच्ची पाण्याचा नळ बांधून आणिला. त्याचे पाणी पुण्यात सदाशिव पेठेच्या व पुष्करणीच्या हौदास मिळत असून त्यापासून शहरच्या लोकांस फार उपयोग होत असे. वेलबागेतील विष्णुमंदिर चार वर्षांत बांधून पूर्ण केले. देवाच्या उत्पन्नासाठी सालिना पाच हजार रु. ची व्यवस्था केली आहे. त्यांनी शनिवार वाड्याजवळ एक विस्तीर्ण व सुशोभित वाडा बांधला. त्यांनी काळ्या वावरात एक बाग केली. तिचा विस्तार तीस बिघे आहे. त्यांनी गणेशपेठ वसविली. तीत एक धर्मशाळा व दोन इमारती बांधल्या. याशिवाय बागेच्या आसपास लहान मोठे दहा वाडे बांधले. त्यांचे मूळ गाव वेळास येथे कालभैरवाचे देवालय त्यांनीच बांधविले आहे. खोपोलीस पाण्याचा तलाव, पक्का चिरेबंदी व शंकराचे देवालय, लोकांस उतरण्याकरिता एक धर्मशाळाही बांधविली. तेथे एक अन्नछत्र ठेविले होते. वाईजवळ मेणवली हा गाव मंत्री यांजकडून नानास इनाम मिळाला होता तेथे त्यांनी कृष्णेच्या तीरास घाट, अमृतेश्वर व लक्ष्मी वासुदेव अशी दोन देवालये व राहण्याकरिता एक मोठा वाडा व त्यासभोवती किल्ल्यासारखी तटबंदी आणि दरवाज्याच्या आसपास ब्राह्मणास राहण्याकरिता घरे वगैरे इमारती तयार केल्या. श्री क्षेत्र काशी येथे दुर्गा घाटीजवळ त्यानी एक मोठा दक्षिणी तऱ्हेचा वाडा बांधविला आहे. तेथे कर्मनाशी नदीवर एक पूल बांधला आहे. याखेरीज त्यांचे जेथे जेथे इनाम व जहागीर गाव होते तेथे तेथे वाडे, देवालये, धर्मशाळा, नळ, तलाव, विहिरी बांधविल्या असून इतर ठिकाणीही मार्गस्थांच्या सोयीसाठी अन्नछत्रे, तलाव, छायेसाठी मार्गाच्या दोन्ही बाजूस झाडे इत्यादि शेकडो परोपकारी कृत्ये त्यांनी केली आहेत. या सर्व कामासाठी नानांस एक कोट रु. लागले असावेत.

गृहसौख्याचा वाटा नानांच्या नशिबी फारच थोडा होता. त्यांनी एकंदर नऊ लग्ने केली. त्यांपैकी सात बायका त्यांच्या हयातीत मरण पावल्या. बाकीच्या दोन अगदी लहान वयाच्या राहिल्या होत्या. पैकी एक

नानांच्या मरणानंतर १५ दिवसांनी वारली. नानांस एकंदर तीन मुले झाली. दोन मुली व एक मुलगा पण ती सर्व बालदशेतच मरण पावली.

नानांचा मित्रपरिवार बराच मोठा होता. नानांच्या कचेरीत तीन• चारशे कारकून असत. या कचेरीस 'फड' असे म्हणत. तेथे सर्व राज्याच्या जमावंदीचे व लष्कराचे व जहागिरीकडले हिशेब तपासले जात. हल्ली पुण्यास पेशवे दप्तर आहे त्यात नानांच्या अमदानीतले कागदपत्र जे इतक्या उत्कृष्ट, व्यवस्थेशीर स्थितीत आहेत ते नानांच्या बुद्धिमत्तेचे फळ होय.

नानांना अनेक चिजा मागविण्याचा नाद होता. सोन्याची तबके, पानदाने, गुलाबपाणी, अत्तरदाण्या, चांगले तंबोरे, चित्रे इत्यादि अनेक कलाकुसरीच्या जिनसा त्यांनी ठिकठिकाणाहून मिळवून त्यांचा सग्रह केला. नाना श्रद्धाशील होते. पण धर्मभोळे नव्हते. काशी येथे आपल्या हातून काही पुण्यकृत्य घडावे म्हणून नानांनी तेथील कर्मनाशी नदीवर पूल बांधण्याचे काम सुरू केले. पुलाचा पाया टिकेना, तेव्हा तेथील ब्राह्मणांनी अनुष्ठानास आरंभ केला नानांनी अनुष्ठान बंद केले. आणि इंग्रजांच्या-मार्फत बेकर नावाचा इंग्रज इंजिनियर आणवून त्याच्याकडून यांत्रिक मदतीने पुलाचा पक्का पाया घालण्याचे काम पूर्ण केले. ही गोष्ट सन १७९५ सालातील आहे.

नानांचे हेरखाते मोठे दक्ष असे. जेथे संशय दिसेल, पाणी मुरते आहे असे वाटले की, तेथे गुप्त बातम्या काढण्यासाठी नाना आपले हेर नेमीत. हे हेरही अशा रूपाने जात की त्यांचा कधी कुणाला सहसा संशय यायचा नाही. ही हेरमाणसे अगदी हलकी कामे करायची. कुणी हुजऱ्या, तर कोणी मशालजी ! कुणी आचारी, पाणके तर कुणी, शास्त्री पडित. एका ठिकाणी एकच नाही, तर तीन तीन, चार चार माणसे ! पण त्यांना एकमेकांच्या कामाचा पत्ता नसायचा ! या माणसांकडून नानांच्या हाती गुप्त बातम्या आल्या की नाना लगेच बंदोबस्ताच्या कामाला लागत.

नानांच्या काळात इंग्रज वकील मॅलेट पुण्याला संगमाजवळ राहिले. मोठ्या खुबीदारपणाने त्यांचा कारभार चाले. स्वतःच्या संरक्षणासाठी

मुंबईहून जंकरे म्हणजे लहान तोफा आणावयाचे त्यांनी ठरविले. पण त्यासाठी सरळ परवानगी मागावी तर नानांकडून ती मिळायची नाही ! मग त्यांनी आपले खाण्यापिण्याचे पदार्थ रोज मुंबईहून आणण्याची परवानगी पेशवे दरबारकडे मागितली.

"रोज तीन मेणे तुमच्या खाद्यपेय पदार्थांचे मुंबईहून यावेत. त्यास सरकारकडून मनाई होणार नाही, पण यात एखादी गैरवाजवी गोष्ट झाल्यास त्याबद्दल कडक विचार केला जाईल" अशी नाना फडणिसांनी परवानगी दिली. मॅलेटला ही गोष्ट सोयीची वाटली आणि त्याप्रमाणे मुंबईहून बोर घाटातून रोज तीन मेणे पुण्यास येऊ लागले. रोज बिनबाभाट मेणे येतात असा अनुभव आल्यावर एक दिवस या मेण्यांतून लहान जकरे म्हणजे छोट्या तोफा पुण्यात आणण्याचा घाट मॅलेटने घातला. ते घेऊन सामानाचे मेणे मुंबईहून निघाले. खंडाळ्याच्या घाटाने ते पुण्याल येऊ लागले. नानांच्या हेराकडून ही बातमी त्यांना समजली. त्याच्या आधाराने नानांनी हुकूम सोडले ! त्या दिवशी खाद्यपेय पदार्थांचे मेणे पुण्यास येऊ दिले. ज्यात जंकरे होते तो तिसरा मेणा, खोपोलीच्या जकात चौकीवर अडवून ठेवला ! इंग्रजांच्या वकीलाला हे समजताच त्याने पेशव्यांच्या दरबारात येऊन आकांडतांडव केले. पण नानांनी मेण्यातील सामानाची यादी मागताच इंग्रज वकिलाची स्वारी गडबडली. मनांत काय ते उमगली. झाली एवढी फजिती पुरे झाली असे पाहून त्याने तो अडविलेला मेणा मुंबईला परत नेण्याची परवानगी मागितली. नानांनी ती दिली. पाताळयंत्री इंग्रज मात्र मनात समजले की नाना आहेत तोपर्यंत आपले काही चालावयाचे नाही.

निजाम अल्लीकडल्या तर जनानखान्यातल्याही बातम्या नानांना समजत ! राघोबा दादांची पत्नी आनंदीबाई एवढ्या आतल्या गाठीची आणि पक्की; पण तिची कोपरगावची सबंध दिनचर्या नानांस कळे ! त्यांनी तशी खास व्यवस्थाच केली होती. आनंदीबाई कधी म्हणे, "कारभाऱ्यांनी आम्हांला निर्माल्यवत् केले ! जेथे मोती वेचले तेथे गोवऱ्या वेचण्याची पाळी आली." भटाभिक्षुकांना दानधर्म करण्याची वेळ आली

म्हणजे म्हणे, "दानधर्म खूप करावा असे वाटते ! पण आता आमच्या हातात काऽही नाही !" आनंदीबाईला खर्चायला हजारो रुपयांची तरतूद करूनसुद्धा तिच्या कपड्यांच्या, दागिन्यांच्या, एव्हढेच काय टेंब्याच्या पलित्याला लागणाऱ्या कापडाच्याही मागण्या असत. बाईंची कितीतरी गुप्त राजकारणेही असत. पण त्या सर्व बारीकसारीक वार्ताही नानांना आपल्या हेरामार्फत नित्य कळत असल्याने तिची सर्व कारस्थाने नाना फडणिसांनी मुळांतूनच उपटून टाकली. या आनदीबाईवर आणि तिच्या कारस्थानावर जर नानांनी बारीक लक्ष ठेवले नसते तर तिच्या नवऱ्याप्रमाणे म्हणजे राघोबाप्रमाणेच तिनेही पेशवाई गोत्यात आणली असती.

BVBK-0402071